
लयभास्कर
खाप्रुमाम पर्वतकर

कला अकादमी
गोवा



**श्री. विष्णू सुर्या वाघ**
अध्यक्ष, कला अकादमी गोवा

प्रकाशक
**श्री. निळकंठ शिंगणापुरकर**
सदस्य सचिव
कला अकादमी गोवा

---

संकलन
**डॉ. दत्तगुरु ल. आमोणकर**
कार्यक्रम व विकास अधिकारी
कला अकादमी गोवा

**दि. २० फेब्रुवारी २०१६**
कला अकादमी पणजी - गोवा
१ल्या लयभास्कर खाप्रुमाम पर्वतकर
तालमहोत्सव निमित्ताने प्रकाशीत पुस्तिका

कला अकादमी गोवा
आयोजित

# स्वरप्रभात पर्वतकर तालमहोत्सव

दि. २० व २१ फेब्रुवारी २०१६
स्थळ: दिनानाथ मंगेशकर कलामंदिर, पणजी–गोवा.

## कार्यक्रम

### उद्घाटन समारंभ

शनिवार, दि.२० फेब्रुवारी २०१६–सांय.५.०० वा.

▼

उद्घाटक – **मा. श्री. विष्णू सुर्या वाघ**
अध्यक्ष, कला अकादमी गोवा

खास उपस्थिती – **श्री. सुशांत खेडेकर**
उपाध्यक्ष, कला अकादमी गोवा

**श्री. निळकंठ शिंगणापुरकर**
सदस्य सचिव, कला अकादमी गोवा

**डॉ. वनमाला पर्वतकर व पर्वतकर कुटुंबिय**

# कार्यक्रम

## सत्र-१

**शनिवार, दि. २० फेब्रुवारी २०१६ - सायं. ५.१५**

### तबला एकलवादन

**पं. विभव नागेशकर**

साथसंगत-

**दत्तराज म्हाळशी** - संवादिनी लेहरा

---

### थ्री जनरेशन पर्कशन एन्सेम्बल

विव्दान **विक्कू विनायक्रम** - घटम

**व्ही. सेल्वागणेश** - पर्कशन

**स्वामीनाथन सेल्वागणेश** - खंजिरा

---

## सत्र-२

**रविवार, दि. २१ फेब्रुवारी २०१६ - सायं. ४.००**

### तालसंवाद

**पं. उल्हास वेलींगकर** - तबला

**शांतीलाल म्हार्दोळकर** - ताशा (लोकवाद्य)

**गजानन आमोणकर** - पखवाज

**मयुरेश वस्त** - तबला तरंग

साथसंगत-

**शिवराम (अमर) मोपकर** - तबला

**सचिन तेली** - गायनसाथ

**दत्तराज म्हाळशी** - संवादिनी लेहरा

---

### कर्नाटक तालवाद्य कचेरी

विव्दान **थिरुवरुर भक्तवत्सलम** - मृदंगम

विव्दान **सुरेश वैद्यनाथन** - घटम

विव्दान **सी. पी. व्यास विठ्ठल** - खंजिरा

विव्दान **भीमाचार राजशेखर** - मोरसिंग

---

### तबला जुगलबंदी - टू मॅस्ट्रोज

**पं. कुमार बोस** (बनारस घराणा)

**पं. अनिन्दो चॅटर्जी** (फरुखाबाद घराणा)

साथसंगत -

**उ. फारुक लतीफ खान** - सारंगी

**अतुल फडके** - संवादिनी लेहरा

**कला अकादमी गोवा**

आयोजित

# खाप्रुमाम पर्वतकर तालमहोत्सव

दि. २० व २१ फेब्रुवारी २०१६

स्थळ: दिनानाथ मंगेशकर कलामंदिर, पणजी-गोवा.

# लयभास्कर खाप्रूमाम

भारतीय संगीताच्या इतिहासात अमीर खुसरो, तानसेन, गोपाळ नायक, स्वामी हरिदास, बैजू बावरा, सदारंग अदारंग, त्यागराज, अब्दुल करीम खाँ, विष्णू दिगंबर पलुसकर, बडे गुलाम अली खाँ ही नावे अत्यंत आदराने घेतली जातात. भल्याभल्यांनी नतमस्तक व्हावे असे हे काळाच्या परिघालाही ओलांडून जातील असे सर्वश्रेष्ठ कलाकार. याच मालिकेतील गोमंतकाची देणगी म्हणजे लयभास्कर खाप्रूमाम पर्वतकर. लयीचे अंतरंग नव्हे तर अंतरंगाचाही कीस काढून त्या ब्रह्मज्ञानाचा अधिक खोल ठाव घेण्यासाठी तालाला पूर्णपणे अंकित करून त्याला आपल्या मुठीत ठेवणारे आणि लयीचे गहन गूढ ज्याला उकलले होते असे एक महान तपस्वी! खाप्रूमाम म्हणजे संगीताचे चालते बोलते विद्यापीठ. लय हा संगीताचा प्राण. खाप्रूजींनी कुडीतून प्राण जाईपर्यंत अखंडितपणे लयीची साधना केली. अत्यंत गूढ असलेल्या लयब्रह्माचा अभ्यास करून त्याची विषम बाजू सामान्यातल्या सामान्यांनाही समजेल इतकी त्यांनी सोपी करून दिली. लयशास्त्राचा इतका विद्वान अख्ख्या हिंदुस्थानात दुसरा कुणी झाला असेल की नाही याची शंका आहे.

खाप्रूमामांचा जन्म १८८० साली पर्वतावर झाला. या पर्वताच्या माथ्यावर श्री चंद्रेश्वराचे प्रसिद्ध देऊळ आहे. या देवळाच्या आसमंतात असलेल्या कित्येक घरांतून महान कलावंत निपजले आहेत. विख्यात गायिका दुलूबाई पर्वतकर, गानतपस्विनी मोगूबाई कुर्डीकर, पखवाजी हरिश्चंद्र पर्वतकर, सारंगीवादक शांबा, रघुवीर, बाळकृष्ण व दत्ताराम पर्वतकर हे सगळे कलाकार याच परिसरातले.

खाप्रूमामांचे मूळ नाव लक्ष्मण. घराणे कलावंतांचेच असल्यामुळे कित्येक पिढ्यांपासून त्यांच्या घराण्यात गायन-वादन, सारंगी व तबला या विषयांची आराखडा चालू होती. त्यांचे मामा रघुवीर यांनी त्यांना सारंगीचे चांगले शिक्षण दिले. दुसरे चुलते हरिश्चंद्र यांनी तबला शिकवला. ढवळीचे प्रसिद्ध ध्रुपद गायक अनंतबुवा ढवळीकर यांनी ध्रुपद-धमारची तालीम दिली. संगीताचे उपजत अंग असल्यामुळे ते लवकरच तयार झाले. चांगल्या चांगल्या गायक-गायिकांची सारंगी व तबल्यावर साथ करू लागले.

घुमट हे गोव्याचे प्रसिद्ध लोकवाद्य. लयवाद्यात अग्रपूजेचा मान असलेले अनुपम वाद्य. प्रत्येक सण-उत्सवात आणि प्रत्येक देवालयात घुमटाचे वादन अपरिहार्य मानले जात असे. सुंवारी हा शास्त्रीय लोकसंगीताचा प्रकार व संतांनी रचलेल्या देवदेवतांच्या आरत्या यामध्ये घुमटवादन हेच मध्यवर्ती असते. खाप्रूमामांनी आपल्या साधनेची सुरुवात याच वाद्याने केली. या साधनेत त्यांनी कालांतराने श्रेष्ठतेचा मान पटकावला. नृत्यातील तत्कार व तबल्यातील अगदी थोडी अक्षरे केवळ इतक्याच सामग्रीवर घुमटकारांनी लयीचे विश्व सर्वांगाने उजळून टाकले. कायदे, परण,..... आड, अतीत, अनागत अशाप्रकारचे आश्चर्यकारक वादन खाप्रूमामनी तारुण्यातच आत्मसात केले. त्यांचे रागज्ञानही चांगल्या प्रकारचे होते. अनेक रागांतून व अवघड नवीन तालांतून त्यांनी अनेकतराण्यांची रचना केली. मोगूबाईसारख्या श्रेष्ठ गायिकेला हे तराणे शिकवले. मात्र हे सर्व करत असताना त्यांची मनोवृत्ती तल्लीन होई ती मुख्यत: त्यातील लयीवरच. पुढे तर वादन आणि वादनाचे तंत्र यापेक्षा लय आणि तिचे अंतरंग यांचाच ठाव घेण्याचा ध्यास त्यांना लागला. लय हा त्यांच्या जीवनाचा स्थायिभाव बनला.

खाप्रूजींचे चुलते चांगले लयकार होते. ते खाप्रूजींना तबला शिकवत होते. एके दिवशी खाप्रूजींनी त्यांना प्रश्न विचारला, 'तुम्ही सर्व तालांत चौपटीपर्यंत लयकारी करता; पण पाचपट, सातपट, नऊपट असे प्रकार का करत नाही? एका लयीची जर समप्रमाणात दुगुण, तीगुण, चौगुण करता येते तर हाच प्रकार विषम प्रमाणात का करता येऊ नये? एक ते सोळा पटीपर्यंत हे प्रकार करता आलेच पाहिजेत.' यावर चुलत्या-पुतण्यात वाद वाढत गेला व खाप्रूजीही चिडिला पडून ते प्रकार प्रत्यक्ष करून दाखवण्याच्या खटपटीला लागले. या नादाने त्यांना अक्षरश: वेड लावले. बाकीचे विषय विसरून ते तालब्रह्मात गुरफटले. एक लय घ्यायची, तिची निमपट, पाऊणपट, सव्वापट, दीडपट, पावणेदोन पट मात्रा घ्यायची, त्यात अर्धी मात्रा मिसळायची, पाव मात्रा कापायची असे करता करता जेवढे म्हणून लयीचे प्रकार करता येतील तेवढे त्यांनी करून पाहिले. हे करताना त्यांची तहानभूक हरपली, शुद्ध-बुद्ध हरवली. येता-जाता, उठता-बसता, सभोवतालच्या सर्वांचेच अस्तित्व विसरून ते नाना कोडी सोडवू लागले. तालशास्त्रातील एक एक कूटप्रश्न घेऊन दिवस दिवस, आठवडे न आठवडे, महिने न महिने त्यावर विचार करून सिद्धांत बांधू लागले. केवळ सहा महिन्यातच त्यांनी एक ते सोळापर्यंतचे लयकारीचे प्रकार साध्य केले व त्याचे प्रात्यक्षिक खुद्द हरिश्चंद्रकाकांनाही करून दाखवले. त्यावेळी त्यांनी सद्‌गदित होऊन खाप्रूजींची पाठ थोपटली. या वेळेपासून त्यांना जो लयकारीचा नाद लागला तो शेवटपर्यंत कायम राहिला.

संगीतशास्त्रातील विद्वान व अभ्यासू लयकार लयीचे सवाईकी, दीडकी, आड, कोआड असे दर्जे सर्वसाधारणपणे सिद्ध करत. परंतु खाप्रूमामच्या हिशेबी या दर्जांना स्थानच नव्हते; कारण याच्याही पुढचे गोआड, भरतआड आणि सुदर्शनआड असे तीन दर्जे त्यांनी सिद्ध केले होते. लयीची कुठलीही बिकट फर्माईश ते लगेच त्याच ठिकाणी करून दाखवत. एका तालात दुसरा कोणताही ताल वाजवून त्याची सम एक आणणे, एका हाताने एक ताल, दुसऱ्या हाताने दुसरा ताल, दोन्ही पायांनी दोन निरनिराळे ताल, तोंडाने पाचवा ताल आणि तबल्यावरील सहावा ताल असे सहा ताल मोजून सर्वांची सम एकत्र आणणे हा त्यांचा हातखंडा खेळ होता. लयीचे अंश पञाणि या अंशाचे पुन्हा अंश ते समजावून सांगून करत असत. एखाद्या गणितज्ञालाही अनाकलनीय वाटावे असे गणित जेमतेम चार-दोन इयत्ता शिकलेल्या खाप्रूमामनी इतक्या सहजपणे सोडून दाखवावे ही एक ईश्वरी किमयाच होती.

पावणे सोळा मात्रांचा 'परब्रह्मताल' ही त्यांची एकमेवाद्वितीय अशी निर्मिती. हा ताल खाप्रूमामांनी अष्टांग परिपूर्ण केला. या पावणे सोळा मात्रांच्या तालात त्यांनी एकशे पंचवीस 'धा' असलेली 'महासुदर्शन' नावाची तालशास्त्रातली अत्यंत कठीण अशी परण बांधली. ही ऐकल्यानंतर भल्या भल्या संगीतज्ञांनी तोंडात बोटे घातली. हा ताल परिपूर्ण करताना खाप्रूमामांचे रंध्रनरंध्र लयमग्न झाले होते. गाढ झोपेतदेखील त्यांचे हात 'महासुदर्शन' परणीत फिरत होते. एका संगीतसाधकाने एकदा खाप्रूमामना विचारले, 'आपण हे जे असंख्य प्रयोग करता, लयीचे कोडे सोडवता, त्याच्या अभ्यासाचा काही निश्चित असा मार्ग आहे का?' यावर खाप्रूमामांनी दिलेले उत्तर विचारप्रवर्तक आहे. ते म्हणाले, 'त्यात विशेष असे काहीच नाही. जो सतत अभ्यास करतो त्याला सर्व काही आपोआप मिळत जाते. लयीचा विचार करताना मला आत

स्वच्छ प्रकाश दिसू लागतो. त्या प्रकाशात सर्व कोडी व प्रमेये स्वच्छ होत जातात.'

१९१९ साली पंडित विष्णू दिगंबर पलुसकरांनी भरवलेल्या संगीत परिषदेत खाप्रूमामांनी तालशास्त्रातील अवघड कोड्यांची उकल करून दाखवणारा पहिला कार्यक्रम सादर केला. त्यावेळी तिथे हजर असलेल्या अनेक विद्वान तालतज्ज्ञांनी खाप्रूजींना मानाचा मुजरा केला. प्रसिद्ध तबलापटूंनी 'खाप्रूजी तुम्ही अद्वितीय आहात, या कलेतला खरा साक्षात्कार तुम्हाला झाला आहे' असे गौरवोद्‌गार काढले.

१९२१ साली भास्करबुवा बखले यांनी आयोजित केलेल्या मैफलीत खाप्रूमामांनी लयकारीचे अनेक प्रकार केले. त्यावेळी खुद्द भास्करबुवांनी 'लयशास्त्रात आपण प्रभू आहात' असे जाहीर करणारे मानपत्र खाप्रूजींना बहाल केले. १९३३ साली मुंबईत एक फार मोठी मैफल झाली. त्यात संगीतसम्राट अल्लादियाँखाँसाहेब, विलायत हुसेन खाँ, फैयाज खाँ आणि भारतातील श्रेष्ठ गायक, वादक व तबलीये हजर होते. खाप्रूजींची चेष्टा करण्याच्या उद्देशाने काही तबलीयांनी 'बारा मात्रांच्या... समान करून बारा मात्रांच्या लयीत ठेका बांधा' अशी विचित्र फर्माईश केली. त्यांचे आव्हान लीलया स्वीकारताना खाप्रूजींनी तेरा मात्रांत ठेका तर बांधला शिवाय त्या तेरा मात्रांच्या वजनात तिहाई टाकून ठेका पुरा केला. ऐकणारे थक्क झाले. अल्लादियाँखाँ सद्‌गदित होऊन म्हणाले, 'तौबा तौबा, धन्य है आप। आपके सामने मैं सौ बार झुक सकता हूँ।' खाँसाहेब अमानअली यांनीही अन्य एका ठिकाणी खाप्रूमामांची स्तुती केली. १९३५ साली मोगूबाई कुर्डीकर यांनी खाप्रूमामांचा पुतळा तयार करून खास आयोजित केलेल्या समारंभात तो त्यांना अर्पण केला. त्यावेळी हैदराबादच्या घरंदाज उस्तादांनी 'आफताब-ए-मौसिकी' (संगीतातील तळपता सूर्य) हे नामाभिधान त्यांना बहाल केले. १९३९ साली मुंबईच्या कलावंतांनी आयोजित केलेल्या शानदार सत्कारात अल्लादियाँखाँसाहेबांनी 'लयब्रह्मभास्कर' ही पदवी खाप्रूमामना बहाल केली. गोमंतकातील कलाप्रेमी लोकांनीही जन्मभूमीत त्यांचा सत्कार घडवून आणला व 'तालकंठमणी' ही पदवी त्यांना अर्पण केली. १९४८ साली पुणेकर रसिकांनीही त्यांचा भव्य सत्कार घडवून आणला. तिरखबाँखाँसाहेबांनी यांना 'लय का अवलिया' हे अभिधान बहाल केले. खरोखर, खाप्रूमाम हे लयशास्त्रातील अवलिये होते. असा कलाकार हजारो वर्षातून एकदाच निर्माण होतो. खाप्रूमाम गोमंतकाच्या भूमीत जन्माला आले हे आपले सौभाग्य. ज्या लोकांनी त्यांची लयसाधना चक्षुर्वैसत्यम् पाहिली ते धन्य. सूर्य ज्याप्रमाणे प्रकाशाची उधळण करतो त्याचप्रमाणे खाप्रूजींनी आपली संगीतविद्या जो जो संपर्कात येईल त्याला मुक्तहस्ते वाटून दिली. त्यांच्या जीवनकाळात त्यांच्या साधनेचा शाब्दिक गौरव अनेकदा झाला; पण चिरस्वरुपात राहावे असे एकही स्मारक उभे झाले नाही. लयब्रह्माच्या या थोर उपासक महात्म्याने ३ सप्टेंबर १९५३ रोजी पर्वतावर अखेरचा श्वास घेतला. लयब्रह्माचा हा चालताबोलता चमत्कार अखेर परब्रह्माशी एकरूप झाला.

- **विष्णू सूर्या वाघ,**
आमदार, सांत आंद्रे मतदारसंघ,
अध्यक्ष, कला अकादमी,
उपसभापती, गोवा विधानसभा

# लयब्रह्मभास्कर खाप्रुजी

या तपस्व्याचे नांव लयब्रह्मभास्कर कै. खाप्रुजी पर्वतकर. खाप्रुजीनी कुडीतून प्राण जाईपर्यंत अखंडितपणे लयीची साधना केली. ती करताना कोणत्याही सामान्य जयिष्णु महत्वाकांक्षेने त्यांचे मन भारलेले नव्हते. त्यांना विजय मिळवायचा होता तो लय नावाच्या शक्तीवर. तो मिळवता मिळवता त्यांच्या शरीराचा प्रत्येक अवयव नि अवयव लयलीन झाला. अध्यात्माची साधूंनी जशी साल काढून ते जेवढे सोपे करता येईल तेवढे करून मुमुक्षूंना दिले., तव्दतच खाप्रुजीनीही गूढ लयब्रह्माला स्वाधीन करून घेऊन त्याची विषम बाजू जितकी सोपी करता येईल, सामान्यातल्या सामान्याला ती समजेल इतकी सहज करूत त्या अगाध ज्ञानातील इंगित समजावून दिले.

लय या वस्तूचे खाप्रुमामा म्हणजे एक संपूर्ण पंचांग होते. ग्रहलाघवासारखेच लयीचे सुक्ष्मतिसुक्ष्म अंश नि अंश त्यांना अवगत झाले होते. लयशास्त्राचा इतका विद्वान अख्ख्या हिंदुस्थानांत दुसरा कुणी झाला असेल की नाही शंका आहे. किंबहुना तसा झालाच नाही असे छातीठोकपणे सांगितल्यास काहीही चुकायचे नाही. असे विचारांती वाटते. जे त्यांनी केले ते आपल्या हयातीतच त्यांनी व्यवस्थित ग्रंथित करून ठेवायला हवे होते. पण दुर्भाग्याची गोष्ट अशी की, तसे घडले नाही.त्यामुळे असा एक पुरुष गोमंतकात होऊन गेला एवढेच सांगण्याखेरीज आज गत्यंतर नाही. ज्या पिढीने खाप्रुमामांना पाहिले आणि ऐकले ते सुदैवी आणि ज्यांना त्याचां सहवास लाभला त्यांचे भाग्य खरोखरीच फार मोठे. मी खापप्रमामांना प्रथम पाहिले तो प्रसंग जसाच्या तसा मला आठवतो.

शिमगोत्सवाची नमनाची पहिली रात्र. पौर्णिमेच्या पूर्ण चंद्राच्या प्रकाशाशी स्पर्धा करू पाहणाऱ्या चौदा वातींच्या लामणदिव्याच्या झगझगीत प्रकाशात 'श्री भगवंता यादवाच्या राया हो' ही चंद्रावळ सुरु झाली. गांवचे आणि पंचक्रोशीतले पाहुणे वादक करून उभे राहिले. पांच सहा घुमटे, दोन समेळ, दोन कांसाळी, ट्रायंगल, मृदंग आदि वाद्यांच्या सुरांची एकतानता झाली. 'भगवंता' या शब्दाच्या पहिल्या अक्षरावर 'सम' 'गाठून' सुवारी झाली.

उत्सवासाठी केवळ घुमट वाजविण्याच्या उद्देशाने आणि उमेदीने आलेल्या पाहुण्या वादकाने आपले कसब दाखविण्याकरिता हळूच एक मुखडा मारला आणि परान घेऊन तो समेवर आला. दैववशात त्याचा तो मुखडा चुकला. सम बरोबर गाठली गेली नाही. गांवकरी हसले. पाहुण्याची त्या हसण्याने नालस्ती झाली. पाहुण्याच्या बाजूचे आणि इतर यांच्यात वाद सुरु झाला. साहजिकच दोन पक्षात वाद विकोपाला गेला. मग शहाणी माणसे मध्ये पडली. म्हणाली 'नमनालाच खंड पाडू नका. उद्या सकाळी खाप्रुमामांना बोलावू आणि खरी बाजू कुणाची हे पाहून वाद मिटवून टाकू' तात्पुरत्या समाधानाने वादन चालू राहते, पण थोडे साशंकित मनाने.

दुसऱ्या दिवशी खाप्रुमामा गावात आले. डोक्यावर करड्या रंगाची चपटी टोपी, बंद गळ्याचा पारशी फॅशनचा कोट, धोतराचे साधे नेसण आणि कोल्हापुरी चपला. वेष अतिशय साधा. चेहऱ्यावरच्या पांढऱ्या शुभ्र मिशांनी पहिल्याप्रथम लक्ष वेधून घेतले आणि त्यांच्या अर्धोन्मीलित डोळ्यांनी अध्ययनाच्या कैफात असल्याची साक्ष दिली.

खाप्रुमामांनी निवाडा दिला आणि तो सर्वमान्य होऊन आनंदात उत्सव पुढे चालू राहिला. इथे मी खाप्रुमामांचा घुमटावर सवारीत सहज फिरलेला वजनदार हात ऐकला.

कालांतराने खाप्रमामांचे शिष्य श्री विश्वंभर पर्वतकर यांच्या विद्यालयात त्यांचे लयकारीचे प्रकार पहायला मिळाले. लय ही काय गोष्ट आहे याचा समज आल्यानंतर खाप्रुमामांच्या लयकारीच्या चमत्कारांबद्दल खूप ऐकले होते. कार्यक्रमाला प्रत्यक्ष सुरवात होईपर्यंत विशेष काही वाटले नाही. पण नंतर जे ऐकले आणि पाहिले त्याने मात्र दिङ् मूढ  झालो, मंत्रमुग्ध झालो. पांच 'धा' चा चक्रदार, सात 'धा' चा चक्रदार, आठ, नऊ, दहा, पंधरा, वीस असे करता करता पस्तीस आणि चाळीस 'धा' चे चक्रदार त्यांनी विश्वंभरांनी तबल्यावर धरलेल्या ठेक्यावर म्हणूत दाखविले. त्यानंतर सम, विषम मात्रांची भरती, वजाबाकी, गुणाकार, भागाकार इत्यादी गणिती प्रकारही त्यात दाखविले गेले. परंतु आ वासू पहायला लावणारी दुसरी एक अशक्य गोष्ट त्यांनी केली. ती म्हणजे स्वतः तबला हातात घेऊन तोंडात चौदा मात्रांचा चौतालाचा बोल आणि हाताने तबल्यावर सोळा मात्रांचा त्रितालाचा बोल वाजवून दोन्हीही एकाबरोबर समेवर आणले. शिवाय लांबलचक असा एक त्रिपल्लवीतला चक्रदार तोंडाने उलट्या क्रमाने म्हणून त्याचवेळी हाताने तबल्यावर तो सुलट्या क्रमाने वाजवून दोन्ही एका बरोबर समेवर आणले. शिवाय लांबलचक असा एक त्रिपल्लवीतला चक्रदार तोंडाने उलट्या क्रमाने वाजवून दोन्ही एका बरोबर समेवर आणले त्यावेळी मात्र ह्या महान आश्चर्याबद्दल पारावार राहिला नाही. त्या महान तपोनिष्ट विद्वत्तेपुढे मस्तक नम्र झाले. अशी किमया आजतागायत हिंदुस्थानात कुणी केलेली ऐकिवात नाही. कदाचित तशी ती होईल की नाही याबद्दलही शंका आहे. कारण खाप्रुमांसारखे चिन्मात्रस्वरूप कलावंत शतकातून एकदाच जन्माला येतात. आणि त्यांच्याबरोबर त्यांची ती थक्क करणारी कलाही अस्तंगत होते.

खाप्रुमामांचे जन्मग्राम 'पर्वत'. पर्वत हे कसल्याच आधुनिक सुखसोई नसलेले गोमंतकातले माथेरान. या पर्वताच्या माथ्यावर श्री चंद्रेश्वराचे स्वयंभू लिगाचे एक छोटेसेच  देऊळ आहे. त्या देवळाच्या आसमंतात असलेली सोळा सतरा कौलारू घरे हीच त्या गावची वसाहत. जीवनोपयोगी वस्तूंसाठी इथल्या लोकांना चार मैल वाकड्या तिकड्या वळणी वाटेने खाली पारोडे गावात यावे लागते. परंतु इथल्या प्रत्येक घराने श्रीचंद्रेश्वराच्या कृपेने असामान्य असे कलावंत दिले.

विख्यात गायिका दुलुबाई पर्वतकर इथल्याच. श्रीमती मोगूबाई कुर्डीकर याच परिसरातल्या. हरिश्चंद्र पर्वतकर उत्तम पखवाजी होऊन गेले. शांबा पर्वतकर, रघुवीर पर्वतकर, बाळकृष्ण पर्वतकर यांनी सारंगीसारख्या कठीण वाद्यात नैपुण्य दाखविले. चालू पिढीतले दत्तारामजी पर्वतकरांसारखे सारंगीत नाव कमावलेले कलावंत पर्वतावरचेच.

खाप्रुमामा यांचा जन्म १८७८ ते ७९ च्या दरम्यान पर्वतावरच झाला. त्यांचे पाळण्यातले नाव लक्ष्मण, पण त्यांच्या मातोश्रीने लाडिकपणाने ठेवलेले खाप्रु हेच नाव सर्वतोमुखी झाले. पुर्वायुष्यात खाप्रुमामा सारंगी वाजवायचे. पर्वतावरील कलावंत समाजात अष्टौप्रहर गायन, वादन, नृत्याचा जल्लोश चाललेला असायचा. त्या जल्लोशात

तेथील मुलांची मने आपोआप तयार होत असत. तिथे वाजणाऱ्या सर्व वाद्यांशी त्या मुलांचे नाते जडत असे. ज्या वाद्याला हात लावला ते वाद्य त्याना वश होई. रघुवीर पर्वतकर हे खाप्रुमामाचे मामा आणि हरिश्चंद्र व रामकृष्ण पर्वतकर हे चुलते. या तिघांकडे अनुक्रमे सारंगी व पखवाज यांचे प्राथमिक शिक्षण खाप्रुमामांना मिळाले.

तबल्याच शिक्षण चालू असताना या मुलाच्या मनात असे विचार आले की, एका लयीची जर समप्रमाणात दुगण, तिगण, चौगण करता येते तर हाच प्रकार विषम प्रमाणात का करता येऊ नये? वडील माणसांना ही शंका विचारली तेव्हा त्यांनी असल्या विषयात लक्ष न घालता जे सरळ आहे. त्याचाच रियाज करावा असा उपदेश केला. पण खाप्रुमामाचे समाधान झाले नाही. ते शोध घेऊ लागले. आणि नव्या साक्षात्कारात इतके रमले की, येता-जात, उठता-बसता, कार्य करिता, देता घेतां वदनि वदता ग्रास मिळिता, घरी दारी, समस्तांचे अस्तित्व विसरून नाना कोडी ते सोडवू लागले. स्वतःला विसरले, लयलीन झाले. तालशास्त्रातील एक एक कूटप्रश्न घेऊन दिवस दिवस, आठवडेन आठवडे. महिनेन महिने त्यावर विचार करून सिध्दांत बांधू लागले.

१९१९ साली स्व. पं. विष्णु दिगंबर पलुस्करांनी भरविलेल्या संगीत परिषदेत खाप्रुमामांनी आपल्या तालशासात्रातील अवघड कोड्यांचा उकल दाखविणारा पहिला कार्यक्रम सादर केला. त्यावेळी तिथे हजर असलेल्या हिंदुस्थानातील अनेक विद्वान तबलियांनी व पखवाजींनी खाप्रुमामांना मुजरे केले. आणि स्वतःस या विषयातले जाड्य विद्वान समजणारे इंदूरच्या ख्यातनाम नान पानसे यांचे शिष्य कै. पांडोबा गुरव वाईकर यांनी केलेल्या फरमाईशीचे सहज जबाब दिल्यानंतर'' खाप्रुजी तुम्ही अद्वितीय आहात. या कलेतला खरा साक्षात्कार तुम्हाला झालेला आहे!' असे उत्स्फूर्त उद्गार पांडोबा गुरवांनी काढले.

१९२१ साली कै. पं. भास्करबुवा बखले यांनी आयोजित केलेल्या मैफलीत खाप्रुमामांनी लयकारीचे अनेक प्रकार करून ज्यावेळी मैफल रंगविली तेव्हा खुद्द भास्करबुवा बखल्यांनी 'खाप्रुजी लयशास्त्रात आपण प्रभु आहात' असे मानपत्र त्यांना बहाल केले.

१९३३ साली मुंबईत एक फार मोठी मैफल झाली. संगीतसम्राट खांसाहेब अल्लादियाखां, खांसाहेब विलायत हुसेनखां, अफताबे मूसिकि फैयाजखां आणि भारतातील अन्य नामवंत गायक. तंतकार व तबलिये या मैफलीस हजर होते. जमलेल्या तबलियांनी या लयकाराची सहज चेष्ठा करण्याकरिता' तुम्ही बारा मात्रांच्या तेरा समान करून बारा मात्रांच्या लयीत ठेका बांधा!'' असा सवाल टाकला.

खाप्रुमामांनी अशा गोष्टी शेकडो वेळा स्वतःशीच करून पाहिल्या होत्या. त्यांनाही गोष्ट अवघड मुळीच वाटली नाही. त्यांनी तेरा मात्रात ठेका तर बांधलाच, शिवाय त्या तेरा मात्रांच्या वजनात 'तिहायी' टाकून ठेका पुरा केला. त्यावेळी हे चेष्टा करणारे तबलिये तर थक्क झालेच, पण संगीतसम्राट अल्लादिया खाना राहवले नाही. सद्गदीत होऊन ते म्हणाले 'तोबा तोबा, धन्य है आप! आपके ज्ञान के सामने सौ बार सर झुकाता हूँ!''

खांसाहेब अमानअल्ली अशाच मैफलीत म्हणाले, 'अमा, हमारी आखी जिंदगी आप की लय की हवामें ही घुमती रहेगी।'' साडेतेरा मात्रांच्या ठेक्यात तीन धांची तिहायी टाकून खाप्रूमामांनी त्या मैफलीत ठेका बांधून दिला होता. तिथे हजर असलेल्या हैद्राबादच्या एका तबलियाने तर खाप्रुमामांच्या पायावर भरल्या डोळ्यांनी डोके ठेवले होते. १९३५ साली श्रीमती मोगुबाई कुर्डीकर यांनी खाप्रुमामांचा एक पुतळा तयार करवून समारंभासह तो त्यांना अर्पण केला. त्यावेळी हैद्राबादच्या कांही घरंदाज उस्तादांनी खाप्रुमामांच्या लयीच्या योग्यतेसंबंधी विश्लेषण करून' लय क्षेत्रातील तळपता सूर्य' (अफताबे मूसिकि) असा त्यांचा गौरव केला आणि त्यानंतर म्हणजे १९३१ साली मुंबईच्या कलावंतांनी जो त्यांचा सत्कार केला तो त्यांच्या आयुष्यात त्यानी केलेल्या साधनेचा गौरव होता.

संगीतसाधकांनी संगीतसम्राटाच्या अध्यक्षतेखाली केलेल्या एका लयसम्राटाचा तो सत्कार होता. अध्यक्ष खांसाहेब अल्लदियाखां यांनी याप्रसंगी खाप्रुमांना 'लयब्रह्मभास्कर' अशी पदवी देऊन जन्मभर केलेल्या साधनेला किताबत दिली. खाप्रुमामांच्या जन्मभुमीतही एक लहानसा समारंभ झाला आणि गोमंतकातील कलाप्रेमी लोकांनी त्याना 'तालकंठमणी' अशी पदवी दिली होती. पुण्यात बॅरिस्टर बाबासाहेब जयकर यांच्या अध्यक्षतेखाली खाप्रुमामांचा सत्कार करण्यात आला.

सारंगी, गायन, पखवाज यातही खाप्रुमामा तरबेज होते. त्यांचे सारंगीतले शिष्यही आहेत. लयकारीच्या नादात त्यानी बाकीचे विषय सोडून दिले. तालब्रह्मात ते गुरफटले. एक लय घ्यायची, तिची निम्पट, पाऊणपट, सव्वापट, दीडपट, पावणेदोन, त्यात अर्धी मात्रा मिसळण. पाव मात्रा मिसळणे असे करता जेवढे म्हणून त्या लयीचे प्रकार करता येतील तेवढे करण्यात या तपस्व्याने देह वेचला. ते करताना त्याची शुध्द बुध्द हरपली. तहान-भूक हरपली, सारे भान हरपले. आंघोळीला म्हणून जात आणि पाण्यात लोटा बुडविताना एखादा हिशेब त्याना सुचे. तो सुचला की, आपले आले अंग पुसायचे आहे याची आठवण त्याना राहत नसे. ओले वस्त्र तिथेच टाकून नग्नावस्थेत बाहेर येत. 'आर्किमिडीस' सारखे शेवटी शेवटी मांडीवर, छातीवर, मस्तकावर जिथे सुलभ असेल तिथे ताल धरून मात्रा बसणे हाच त्यांचा दिनक्रम ठरला.

पावणेसाळा मात्रांचा 'परब्रह्मताल' ही त्यांची एकमेवाद्वितीय अशी निर्मिती. हा ताल खाप्रुमामांनी अष्टांगपरिपूर्ण केला. या पावणेसोळा मात्रांच्या तालात त्यांनी एकशे पंचवीस 'धा' असलेली 'महासुदर्शन' नावाची तालशास्त्रातली अत्यंत कठीण अशी परान बांधली. तालज्ञात्यांनी ती ऐकल्यावर 'नेति नेति' असे उद्गार काढून हात टेकले. या किमयेने त्यांची कीर्ती भारतभर पसरली होती. हा ताल परिपूर्ण करताना या महापुरुषाचा रंध्रन रंध्र लयमग्न झाला होता. गाढ झोपेतदेखील जमिनीवर वा फळ्यावर त्यांचे हात महासुदर्शन परानीत फिरत होते.

हजारो मुखडे त्यांना मुखोद्गत होते. स्वतः त्यांनी शेकडो गति, रेले, तोडे व परानी बांधल्या होत्या. त्यांच्या तालाच्या प्रकाराबद्दल सांगायला लागलो तर महाभारताएवढा ग्रंथ लिहावा लागेल. मनाने ते अत्यंत उदार होते. कुणी एखादा मुखडा किंवा बोल

मागितला तर प्रेमभराने त्याला चार पाच मुखडे आणि गति शिकवीत. त्याला समजावून देऊन ते त्याच्या गळी उतरेपर्यंत श्रम करीत. त्यांना विद्या मागणारा हवा होता. आपले ज्ञान कुणी चोरील अशी संभ्रांत अवस्थाच नव्हती. ज्याने ज्याने मागितले त्याला त्याला त्यांनी मुक्त मनाने दिले. जसे ज्ञानी तसेच ते दातेही होते. पं. रामसहाय यांच्या बनारस घराण्यासारखे तबल्यातले एक नवे घराणे जन्माला घालायचे त्यांचे सामर्थ्य होते. परंतु पं. रामसहाय यांच्या पाठीशी जसे सारे बनारस उभे राहिले आणि सिध्ध पुरुष म्हणून रामसहाय्यांना पूज्य मानले, तसे मात्र खाप्रुमामांच्या आयुष्यात घडले नाही. त्यांच्या साधनेचा शाब्दिक गौरव झाला. पण तो गौरव हवेत विरणारा होता. चिरस्वरुपात रहावे असे काही घडले नाही.

असा हा लयब्रह्म भास्कर स्वभावाने अत्यंत प्रेमळ आणि तितकाच नम्र होता. रस्त्यात भेटले असताना आस्थेने कुशल विचारल्याशिवाय कधी पुढे गेले नाही. बोलता बोलता देखील ते लयमग्न असल्याचे त्यांचे धुंद डोळे सांगत. अशावेळी तोंडातल्या तांबुलाचा रस त्यांच्या अंगावर ओघळत आहे याची जाणीव करून दिल्यास तो कचरा झाल्यासारखा झटकून ओढग्रस्त चालीने बोटांची चाळवाचाळव करीत पुढे सरकत असत.

परवा तिरखवां खांसाहेब म्हणाले 'ओ तो लय का औलिया था!' 'यंग इंडिया' ग्रामोफोन कंपनीने त्यांच्या काही ध्वनिमुद्रिका घेतल्या. आज त्या ज्यांच्याजवळ असतील त्यांच्याजवळ तो एक ठेवा असेल. यंग इंडिया कंपनी तर आता अस्तित्वात नाहीच. त्यामुळे त्या ध्वनिमुद्रिकाही त्या कंपनीबरोबर अस्तंगत झाल्या.

मरणापूर्वी खाप्रुमामांचे भान हरपले होते. त्यांच्या पोटात औषधपाणीदेखील जात नव्हते. पण त्यांचे शरीर मात्र लयीचा कोणातातरी गूढ प्रश्न सोडवित होते. ओठ काहीतरी अज्ञात असे पुटपुटत होते. आणि आपण निर्माण केलेले सिध्दांत, प्रमेये व लयीचे गहन चमत्कार बरोबर घेऊन तारीख ३ सप्टेंबर १९५३ रोजी या अभिजात, अजोड, ऋषितुल्य कलावंताचा आत्मा लयस्वरूपी विलीन झाला. त्यांचे असामान्य कर्तृत्व त्यांच्याबरोबर अंतर्धान पावले. युगाची शक्ती युगाबरोबर अंतर्धान पावते तशी!

साभार

**कै. गोपालकृष्ण भोबे**
'कलात्म गोमंतक'
प्रकाशक-कला अकादमी गोवा,
पणजी-गोवा
प्रथमावृती-१९७२



# लयभास्कर लक्ष्मणराव पर्वतकरांची कलासाधना

गोमंतकातील चंद्रनाथ पर्वतावर माझे वडील महर्षी खामुजी पर्वतकर यांचा जन्म झाला. या पर्वतावर बावीस लहानशी घरे आहेत. ही सर्व घरे कलावंताची असून त्यातले बहुतेक नामवंत कलावंत परमेश्वराचरणी लीन झाले आहेत. या घरांपासुन अर्धा मैलवर शिखरावर चंद्रेश्वराचे (शंकराचे) देऊळ आहे. येथून सर्व गोव्याचा देखावा सृष्टिसौंदर्याने ओतप्रोत भरलेला असा अत्यंत आल्हाददायक व स्मरणीय दिसत असतो. निसर्ग जणू काय आपला दास होऊन आपल्या पायाशी क्रीडा करीत असल्याचा भास होतो, व ईश्वराच्या अस्तित्वाची कल्पना ताबडतोब मनाला पटते.

माझे आजोबा कै. रामकृष्ण पर्वतकर, कै. रघुवीर पर्वतकर त्याचे शिष्य कै. हरिश्चंद्र पर्वतकर व शांबा पर्वतकर यांच्यापाशीच आमच्या वडिलांनी आपल्या कलेचा ओनामा गिरविला.

लहानपणी पंधरा वर्षाचे असताना एका विद्वान कलाकारांने आमच्या वडिलांना प्रश्न केला म्हणतात,' तालाच्या एका मात्रेचे चार चार विभाग (एक चतुर्थांश भाग) का होऊ नयेत? वडिलांनी उत्तर दिले, 'होऊ शकतात, चारच काय, सोळा विभागदेखील होऊ शकतात, परंतु अतिशय प्रयत्न करून एक चतुर्थांश भागाचे ज्ञान मिळवावे लागेल'

## एकलव्यासारखी साधना

त्या क्षणापासूनच, म्हणजे वयाच्या १६ व्या वर्षापासून वडिलांनी तालशास्त्राच्या अतिशय बिकट अशा साधनेला नेटाने सुरुवात केली. हळूहळू त्यांना चार विभागाचे पूर्ण ज्ञान झाले. पुढे आपणच आपले गुरु होऊन अहोरात्र प्रयत्नाने एका तपानंतर सोळाव्या गुणाचं एक तोळांश मात्रेचे पूर्ण ज्ञान त्यांनी भरून घेतले व त्रितालाच्या सोळा मात्रात, नऊ, दहा, अकरा, तेरा, पंधरा व सतरा मात्रा ते सहजलीलेने भरून दाखवू लागते ! पुढे पुढे त्यांचा हा निदिध्यास वाढत गेला. सर्वसाधारण रसिकांचे मनोरंजन करून लोकप्रियता, कीर्ती व पैसा संपादन करण्यापासून कायमचे अलिप्त राहिले. लय क्षेत्रातली अद्भुत अशी कामगिरी करून व विद्या संपादून अगदी मरणाच्या शेवटच्या क्षणापर्यंत संशोधन चालू ठेवून ती विद्या आत्मसात करण्यातच त्यांनी आपले पवित्र आयुष्य वेचले.

जागृतावस्थेतच नव्हे तर निद्रावस्थेत सुध्दा त्यांना तालशास्त्राचा ध्यास लागलेला असे. आड, कोआड, गोआड, भरतआड व ब्रह्मआड अशा पाचही लयी जवळजवळ तीन तपानंतर त्यांनी साध्य करून घेतल्या. हे नवनविन सिध्दांत आत्मसात करण्याच्या हव्यासात त्यानी संसारातील सर्व उपभोग कायमचे दूर लोटले होते. त्यांची ही तऱ्हा बघून लोक त्यांना तुकाराम म्हणू लागले. ब्रह्मानंदी लागली टाळी! कोण देहाती सांभाळी! खरोखर, त्यांच्या उत्तर आयुष्यात अशीच स्थिती झाली होती. पर्वतावरील अरण्यात बर्हिदिशेस गेले असताना त्याच ठिकाणी ते तास तास लयनादात धुंद होऊन

बसत व घरच्या मंडळीना त्याना तेथे जाऊन घरी आणावे लागत असे. मागून त्यांना एक मुलगा झाला. त्याचे नाव शिवनाथ ठेवले होते. परंतु दैवयोगाने वयाच्या पाचव्या वर्षीच त्याच्यावर काळाने झडप घातली. त्यांच्या मरणसमयी आमचे वडील एक विशिष्ट लय हस्तगत करण्यात गढले होते. त्यांच्या मित्रमंडळीनी व माझ्या आईने मुलाला शेवटच्या क्षणी तरी भेटण्याची त्यांना विनंती केली. गावची सर्वच मंडळी शिवनाथाभोवती जमा झाली. दुःखाचा कडेलोट झाला. परंतु वडिलांची लय साध्य करण्यातली एकाग्रता व तन्मयता इतकी जबरदस्त वाढली होती की, त्यांचे तन, मन, भान सर्वस्वी लय क्षेत्रात विलीन झाले होते. 'हा एवढा बोल तयार होताच पाच मिनिटात मी येतो, असे त्यांनी बोलावणाऱ्या मंडळीस उत्तर केले. शिवनाथ परलोकची एक एक पायरी चढत होता. इकडे वडील कलादेवतेच्या मंदिराची पायरी चढत होते. लय साधनेत तादात्म पावून ब्रह्मानंद प्राप्त करुन घेत होते. पाच मिनिटाच्या आतच शिवनाथाचा देह श्रीचंद्रेश्वराचे ठिकाणी मिळून गेला. इकडे आमच्या वडिलांनी हस्तगत करण्यास घेतलेली विद्या शेवटी त्याना प्राप्त झाली. मुलाची व त्यांची भेट मात्र झाली नाही. यावरुन त्यांच्या अलौकीकपणाची कल्पना सहज येईल. खरोखरच भक्तीमार्गात जसे तुकोबाराय तसे कलाशास्त्रात खाप्रुमाम झाले. गोमंतकीय कलावंत त्यांना खाप्रुमाम म्हणत असत. पाच वर्षापूर्वीची गोष्ट. पुणे शहरी मी तेव्हा हायड्रोसीलच्या रोगाने आजारी होतो. तोन महिने मी अंथरुणावरच पडून होतो. मी जगेन अशी आशाच कुणी धरली नव्हती. देवदयेने माझा पुनर्जन्म झाला म्हटल तरी चालेल. वडीलच तेव्हा माझ्या शेजारी झोपत असत. कारण मी पाच वर्षाचा असताना माझी आई परलोकवासी झाल्याने मी मातृसुखाला कायमचा आचवलो आहे. मध्यरात्रीच्या सुमारास १०५ डिग्रीपर्यंत ताप वाढायचा. झोप मुळीच लागत नसे. मी एकसारखा तळमळत असे. अशा परिस्थितीत देखील वडील नेहमी लयसाधनेत पूर्ण गुंगलेले दिसत. मी तापाने तळमळत आहे याचे त्यांना भानही नसे. या तन्मयतेच्या जोरावर आणि आपल्या साधनेच्या बळावर लयशास्त्रात नवीन नवीन असामान्य सिध्दांताची भर घालून मरहूम गायनसम्राट खांसाहेब अल्लादियाखां यांजकडून 'लयभास्कर' ही थोर पदवी त्यांनी प्राप्त करुन घेतली.

## विनम्र आणि विरक्त वृत्ति

ग्वाल्हेर दरबारी मृदंगाचार्य कै. पर्वतसिंग यांनी वडिलांच्या मानपत्रांची कॉपी डोक्यावर घेऊन 'आज मी धन्य झालो, मी जरी मी विद्या अवगत करु शकलो नाही, तरी भारत भूमीवरच्या दुसऱ्या एका माझ्या कलावंत बंधूने ही असामान्य विद्या प्राप्त केली. याचा मला अभिमान वाटतो. असे उद्गार काढले. त्यांना 'लयभास्कर' ही पदवी मिळाल्यानंतर दहा दिवसांनी ते गोव्यास जात होते. वाटेत ते पुण्यात उतरले. संगीत चुडामणी श्री. विनायकराव पटवर्धन यानी आपल्या गांधर्व महाविद्यालयात त्यांचा सत्कार केला. गौरवप्रसंगी पदवीचे ते 'मानपत्र' बघण्याची त्यांची इच्छा व्यक्त केली. वडील खिशात शोधू लागले. बऱ्याच वेळानंतर कुठल्यातरी खिशाच्या कोपऱ्यात ते चुरगळलेले मानपत्र त्यांना आढळले. त्या मानपत्राचे काय वर्णन करावे! त्या अमोल मानपत्राची



निव्वळ रद्दी झाली होती. 'लयभास्कर' पदवीच्या मानपत्राची ती दुर्दशा पाहून श्री विनायकरावांना अतिशय वाईट वाटले. त्या मानपत्रावर अल्लादियाखां, फैयाजखां, विलायत हुसेन, बी. आर. देवधर, जगन्नाथबुवा पंढरपुरकर, मृदंगाचार्य माधवसिंग, मथुरेचे पखवाजी मख्खनजी, हबीब उद्दीनजी, महाराष्ट्र संगीत विद्यालयाचे बाबुराव गोखले वगैरे पुष्कळ कलातपस्वांच्या सह्या होत्या.

परंतु कीर्तीचा जरासुध्दा संपर्क नको असे मानणाऱ्या वडिलांना मानपत्राची काय पर्वा असणार! या अमोल मानपत्राच्या या लौकीक जगाहुन कितीतरी पटीने उच्च उदात्त संगीत क्षेत्रात त्यांचा आत्मा वास करीत होता. ते कलादेवतेच्या अगदी जवळ पोचले होते.

१९४६ साली वयाच्या सुमारे ६५व्या वर्षी पुणे शहरी श्रीमंत आबासाहेब मुजुमदार यांच्या अध्यक्षतेखाली वडिलांचा सत्कार फारच मोठ्या प्रमाणात झाला. 'पुणे मुक्कामी असा सत्कार कुठल्याही कलावंताचा झाला नाही. असे पुण्यातील कलावंतांनी व रसिकजनांनी त्यावेळी प्रशंसोद्‌गार काढले होते.

या सत्काराच्यावेळी वडिलांनी भाषण केले त्यावरुन त्यांच्या विनम्र स्वभावाची ओळख पटण्यासारखी आहे. ते म्हणाले, 'हा सत्कार माझा नसून कलादेवतेचा आहे संगीत कलासागरात नाना तऱ्हेची अमुल्य रत्ने आहेत. भगीरथ प्रयत्नाने माझ्या हातात लागलेली एक दोन मोती केवळ सेवा म्हणून मी आपणापुढे सादर केली आहेत. काय म्या पामरें बोलावी उत्तरे! परि त्या विश्वंभरे बोलविले! माझ्या हातात काही नाही. सर्वशक्तीमान दयाघन परमेश्वराची लीला अगाध आहे. केवळ त्याच्याच पूर्ण कृपेने व कलादेवतेच्या वरद हस्तानेच काही थोडी साधना मी करु शकलो आहे. आत स्वच्छ प्रकाश पडला आहे. या प्रकाशाच्या सहाय्यानेच कलादेवतेच्या मंदिराच्या पायऱ्या मी चढू शकलो. उत्तरोत्तर प्रकाश अधिक उज्वल होत आहे. या असामान्य विद्येला मर्यादा नाही. कठीण विषय प्राप्त व आत्मसात करून घेण्याची माझी धडपड अहोरात्र चालु आहे. आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत मी हे संशोधन कार्य चालु ठेवणार व ब्रह्मानंद मिळवणार त्याशिवाय सुटकाच नाही, हाच माझा मोक्ष आहे. तुम्ही पुण्यातील कलावंतानी व रसिकजनांनी कलादेवतेचा गौरव केल्याबद्दल मी तुमचा अत्यंत ऋणी आहे.'

हे भाषण करीत असताना वडिलांच्या डोळ्यातून सारख्या अश्रुधारा वहात होत्या. गोमंतकात व मुंबईत त्यांचे असेच सत्कार होऊन त्यांना मानपत्रे देण्यात आली. संगीत मार्तंड ओंकारनाथ ठाकूर यांनी सुध्दा सुरतेला त्यांचा फारच मोठ्या प्रमाणात गौरव केला होता.

## अनुवंशिक संस्कारांचा वारसा

आमचा घराण्यात हे लयशास्त्र फार जुने म्हटले तरी चालेल. माझे आजोबा कै. रामकृष्णबुवा पर्वतकर घुमट वाजविण्यात अव्दितीय होते. 'नीट ताल धर हं, सांभाळ, घाबरु नकोस,' असे लीलेने व कौतुकाने सांगून भर सभेत वडिलांनासुध्दा ते सहज चुकवित असत. माझी पुज्य मावशी कै. दुलुबाई पर्वतकर ही कै. भास्करबुवांची

शिष्या होती. दत्तारामजी नानोडकर यांच्यासारख्या नामांकित लयबाज तबलजींना तुम्ही किती गोड व कठीण वाजविता परंतु मला चुकवा हो इतके कठीण वाजवा की मी सहज चुकेन. मी चुकल्यावरच मला खरा आनंद होणार आहे! असे ती भर मैफीलीत कौतुकाने आव्हान देत असे. ठुमरी गावी तर दुलुबाईने असे प्रशंसोद्‌गार त्यावेळच्या जुन्या कलावंताकडून निघत असत.

माझे वडील लहानपणी सारंगी वाजवीत असत. त्याचे पट्टशिष्य श्री. दत्तारामजी पर्वतकर महाराष्ट्रात मशहूर आहेतच. श्री दत्तारामजींचे वडील बंधू कै. बाळकृष्ण पर्वतकर यांना वडिलांनीच लयीचे ज्ञान दिले होते. वडिलांच्या सारंगी वादनातील एक चमत्कार माझ्या ऐकीवात आहे. असे सांगतात की, तोंडावर बुरखा घेऊन ते सारंगी वाजवित. वादनाचे वेळी सारंगीसह त्यांचा देह झाकला जात असे. सारंगी वादन ऐकताना असे वाटत असे की, दोन तज्ञ कलावंत दोन सारंग्या निरनिराळ्या सुरात वाजवित आहेत.

हे गुढ काय आहे ते त्यांनी कधीच कुणाला सांगितले नाही. परंतु कल्पना अशी आहे की, ते स्वतः चांगले गात असत. त्यांचा आवाज अतिशय सुरेल असल्या कारणाने सारंगी वादनासारखाच आवाज ऐकू येत असला पाहिजे.

एकदा मुंबई शहरी कै. अमानल्लीखां यांनी भर मैफलीत वडिलांना, खाप्रुजी मी एक तराणा म्हणतो. त्याच्या मात्रा ओळखून तुम्ही तिय्या लावा. माझा तराणा संपेल. त्यावेळी तुमचा तिय्या संपला पाहिजे. तो तराणा मी तीनदा म्हणेन. तिसऱ्या वेळीही तुम्ही तिय्या लावू शकला नाही,तर तुम्ही हरला! असे वडिलांना कौतुकाने आव्हान दिले.

'जर मी काही तपश्चर्या केली असेन तर तराण्याच्या पहिल्या वेळीच तिय्या सहज लागेल. करा सुरु तराणा!' असे वडिलांनी उत्तर दिले. झाले तराणा सुरु झाला. पखवाज हातात घेऊन पहिल्याच वेळी वडिलांनी तीन मुखडे लावल्यावर तराण्याची व तिय्याची सम जुळली आणि प्रेक्षकांकडून 'तोबा, तोबा, धन्य खाप्रुजी असे उद्‌गार निघाले. खांसाहेबांनी 'हमारा दिल आपने खीच लिया'! असे म्हणत वडिलांना कडकडून मिठीच मारली. पुणे मुक्कामी त्रितालाच्या एका आवर्तनात नऊ, अठरा, चोवीस व सत्तावीस मात्रांची चौपल्ली भरविण्याची सतारिये मंगल प्रसादजी यांनी लावलेली पैजही त्यांनी एका क्षणात जिंकून शाबासकी मिळवली होती.

'एकतालाचे बारा मात्रात तेरा मात्रा सारख्या प्रमाणात करुन दाखवील तोच खरा लयबाज'! अशी व्याख्या एका कलावंताने मुंबईस एका मैफिलीत उच्चारली. तेव्हा वडिलांनी 'तेराच काय, साडे तेरा मात्रासुध्दा बारा मात्रात सहज भरता येतील'. असे म्हणून प्रत्यक्ष त्या भरुनही दाखवल्या. सव्वाची सव्वापटही ते सहज करुन दाखवित. ती करीत असताना त्याना समाधी लागल्यासारखे वाटे.

## हे सारे त्यांच्याच कृपेचे फळ

सव्वाशे धा च्या धमार, चौताल व सव्वारी तालातील सुदर्शन परण्या त्यांनी मला शिकविल्या आहेत. तसाच पावणेसोळा मात्रांचा परब्रह्म तालही त्यांनी मला शिकविला आहे. एक एक परण तयार करण्यास त्यांना एक एक वर्ष लागले होते. त्या परणा मी स्वतः वाजवित



असताना मीसुध्दा एकताना होऊन देहभान विसरुन जातो. धमार तालातील परण त्यांनी ग्वाल्हेरच्या पर्वतसिंगाचे चि. माधवसिंग व मथुरेचे मृदंगाचार्य मख्खनजी यांस शिकविली होती. त्या दोघांनी ती परण पाठ केली. बसवली; परंतु मैफलीत वडिलांसमोर ती परण वाजविण्यास ते मुळीच धजत नसत. कारण त्यांची मनोदेवता त्यांना साथ देत असे की, कुठे तरी ती परण चुकेल. सुष्टी नियमाप्रमाणे वडिलांचे अर्धे गुण माझ्यात आल्याकारणाने मी त्या परणा तयार करुन कलकत्याच्या संगीत परिषदेत वाजवून दाखविल्या. धमार तालाच्या परणीच्या लेहरा बांधण्यास सुध्दा मी मी म्हणणारे कलाकार मुळीच तयार होत नसत. परंतु सुदैवाने पं. ओंकारनाथजींचे पट्ट शिष्य व माझे कलाकार बंधु प्रो. बलवंतराय भट्ट यांनी माझ्या सहवासामुळे परिषदेत दिलरुब्यावर १४ मात्रांचा लेहरा बांधला व केवळ त्यांच्याच मजबूत लेहऱ्यावर लय क्षेत्रातील असामान्य अशी ही कामगिरी मला कलकत्ता येथील अखिल भारतीय संगीत परिषदेत रसिकजनांच्या निदर्शनास आणून देता आली. वादन सुरु असताना पं. ओंकारनाथजीनी 'सुनो सुनो क्या अद्भूत लयकारी है। असे म्हणून श्री. अनोखेलाल, गोपाल मिश्र, हबीब उद्दीन वगैरे कलावंताना स्टेजवर माझ्या शेजारी बसविले. ते वडिलांचे व माझे पुर्वजन्मीचे पुण्यच फळास आले असे मी समजतो.

पं. ओंकारनाथाजींच्या अनुग्रहामुळेच वडिलांची असामान्य कला उत्तर हिंदुस्थानात निरनिराळ्या ठिकाणी मला दर्शविता आली. हिंदुस्थानातच नव्हेतर पंडीतजींच्या नेतृत्वाखाली भारत सरकारने अफगाणिस्तानात पाठविलेल्या सांस्कृतिक मंडळासोबत मी काबुललासुध्दा जाऊन आलो. व तेथे या विद्येचा अतिशय गौरव झाला.

पंडितजींच्या कृपेनेच मला थोर पंडित मालवीयांच्या विश्वविद्यालयात संगीत प्राध्यापकाची पवित्र जागा मिळाली. अशा या श्रेष्ठ कलावंताला माझे नम्रतापूर्वक प्रणाम. शेवटची चार वर्षे वडील गोव्यात दूर असल्याकारणाने लयकारीचे आणखी कित्येक प्रकार मी शिकू शकलो नाही याबद्दल मला राहून राहून दुःख होत आहे. त्यांचे अपुरे राहिलेले जे कार्य म्हणजे भारतातील जनतेच्या निदर्शनास ही कला आणणे व तिचे संशोधन चालू ठेवणे त्या महान व पवित्र कार्याचा ईश्वरदत्त अधिकार माझ्याकडेच असल्याकारणाने मी वडिलांचे नाव चिरस्थ्यी करुन त्यांच्या आत्म्यास शांती मिळवण्याचा आटोकाट प्रयत्न करीनच. परंतु माझ्यामागे मोठा प्रपंच असल्या कारणाने काही सिध्दी मी मुळीच साध्य करु शकणार नाही. लयीचे काही प्रकार जे मला झेपणे अगदी अशक्य वाटत होते ते वडिलांच्या पूर्ण आशिर्वादामुळेच मी साध्य करु शकलो. त्याहुन कठीण लयकारी हस्तगत करण्याकडे माझा ओढा आहे खरा, परंतु सावधान, सावधान! असा उच्चार अंतर्यामी होत असतो. कारण माझ्या पाच मुलांना आधार कुणाचाच नाही. ऐहीक व संसारिक सुखाचा त्याग केला असताच मोक्षमार्ग सुलभ होऊ शकतो हे खरे. परंतु मी या सुखाचा त्याग कसा करु शकेन! वडिलांचा प्रसाद म्हणून रुपयातील चार आणे प्राप्त झालेली विद्या रसिक जनांना दाखविणे हेच माझे आद्य कर्तव्य आहे व तेच वडिलांचे खरे स्मारक होय असे मी समजतो.

**ले. स्व. रामकृष्ण लक्ष्मणराव पर्वतकर**
साभार : 'धनुर्धारी' दि. ६ मार्च १९५४

# मानपत्र

## 'लयभास्कर'
## रा. रा. लक्ष्मणरावजी पर्वतकर यांचे सेवेशीं

आज ता. २१ ऑगष्ट १९३९ रोंजीं आपल्या सन्मान गौरवार्थ भरलेल्या आपल्या अनेक स्नेही व चहाते लोकांच्या सभेंत आपणास हें मानपत्र अर्पण करतांना आम्हांस अत्यंत आनंद होत आहे.

आपल्या वयास सध्या ६० वर्षे पुरी झालींत. एवढ्या अवधींत आपण तबलावादनशास्त्रांत अनुपमेय प्राविण्य मिळवून 'ताल' व 'लय' या दोन्हीं क्षेत्रांत अखिल हिंदुस्थानांत जी अद्वितीय कीर्ति मिळविली आहे त्याबद्दल आम्हांस सानंद अभिमान वाटत आहे.

आपलें घराणें विद्वत्तेत नाणावलेलें असल्याने व आपले मातुल कै. रघुवीर पर्वतकर यांच्या देखरेखीखाली बाल्यावस्थेंतच आपण कै. रामकृष्ण पर्वतकर व हरिच्चंद्र पर्वतकर या दोहों कलाभिज्ञ गुरुजींपासून आपण वादनशास्त्रांत आपल्या प्रगतीचा ओनामा गिरविला. थोड्याच अवधींत त्रितालाचे १६ गुण करुन दाखवून आपल्या गुरुजींस 'शिष्यदिच्छेत पराजयम्' या उक्तीप्रमाणे सहर्ष चकित केलें

सन १९१८ किंवा त्या अंदाजांत सुप्रसिद्ध नाना पानसे घराण्याचे शागीर्द कीर्तिवंत पखवाज कै. पांडोबा गुरव वाईकर यांची व आपली गांठ पडली. त्यावेळीं कै. पांडोबा वाईकर यांच्या विनंतीस मान देऊन आपण त्यांना आड, कोआड, गोआड, भरतआड आणि ब्रह्मआड अशा पांचही लयी करुन दाखविल्या आणि आपल्या कलेंत अद्वितीयत्व आहे याबद्दल समाधानाचे उद्गार कै. पांडोबा वाईकर यांजकडून आपणांस अर्पण करण्यांत आले.

लयक्षेत्रांत 'जागा ठेवण्याचें' जें विशिष्ठ अंग आहे त्या बाबतींत सन १९२१ सालीं ज्यावेळीं कै. भास्करबुवा बखले यांची व आपली गांठ पडली त्यावेळीं आपण जें कौशल्य त्यांना दाखविलें त्यावर त्यांनी 'जागा ठेवण्याचें' जें अंग यापुढें आपणावर सोंपविलें पाहिजे अशा तऱ्हेचें विजयपत्र आपणास बहाल केलें.

गायनसम्राट अल्लादिया खांसाहेब, खानसाहेब विलायतखां आणि प्रसिद्ध तबलजी यांच्या सन १९३३ सालीं झालेल्या मैफलींत ज्यावेळीं "१२ चे १३" करणाराच खरा लयबाज अशी त्यांना व्याख्या केली त्यावेळीं आपण हें कौशल्य इतक्या सफाईने व सहजरित्या दाखविलें कीं त्यावेळीं गायनसम्राट खांसाहेब अल्लादियां खां यांनी आपल्या ज्ञानापुढें व कलेपुढें "तोबा तोबा" असे अत्यंत आश्चर्याचे उद्गार काढले.

सन १९३५ सालीं श्री. मोगुबाई कुर्डीकर यांनी रा. रा. रघुवीर रामनाथकर यांजकडून आपला प्लास्टर पुतळा तयार करुन आपणास तो अर्पण केला त्यावेळीं झालेल्या समारंभांत हैदराबादच्या दोन सुप्रसिद्ध तबलजींना ‘लयबाजी’ म्हणजे काय याचें आपण दिग्दर्शन केलें. त्यावेळीं लय क्षेत्रांत आपण सूर्याप्रमाणे दैदिप्यमान आहांत म्हणून त्यांनी आपलें अभिनंदन केलें.

आपल्या वयाचीं षष्ठ्यब्दिपूर्ती झाली आहे. या कलेचा आपणास जागृतावस्थैंतच नव्हे तर निद्रावस्थैंतसुद्धां ध्यास लागलेला आहे ही गोष्ट आपल्या स्नेहमंडळीस माहित आहे. आजच्या या गौरवप्रसंगीं आज आम्हीं आपला सर्व स्नेहीवर्ग आपणास अत्यंत यथोचित म्हणून

## “लयभास्कर”

ही पदवी सादर, सप्रेम आणि सविनय अर्पण करीत आहोंत आणि आपल्या कलेची हिंदुस्थानांत व इतरत्र बिनतोल अशी सेवा करण्यास यापुढेही आपणास उदंड आयुष्य मिळो अशी आम्ही जगन्नियंत्याकडे प्रार्थना करीत आहोंत.

**आपले स्नेही व चहाते.**

दि. २१-८-३९ रोजीं
श्री. पर्वतकरांना त्यांच्या असंख्य चहात्यानीं
मुंबई येथे अर्पण केलेले मानपत्र

**साभार**

(“भारत” दिनांक-१७.३.१९४९)

# "तालकंठमणि"

(मडगांवचें मानपत्र - १४.११.१९४२)

## लयभास्कर श्री. लक्ष्मणराव ऊर्फ खाप्रुजी यांस...

वादनशास्त्राच्या लय व ताल या अंगांत असाधारण ज्ञान प्राप्त करून घेऊन त्याच्या बळावर आपण हिंदुस्थानभर अद्वितीय तालशास्त्रज्ञ व लयभास्कर असा नांवलौकिक मिळविला आहे. अशा वेळीं गोमंतकीय हिंदुसमाज एकमुखाने आपल्या ज्ञानयुक्त तपस्ये बद्दल अत्यादर व्यक्त करीत आहे आणि या आनंदाच्या प्रसंगी आपणास आयुरारोग्य चिंतीत आहे.

आपण आपलें सगळे आयुष्य कलेच्या एकनिष्ठ सेवेंत व्यतीत केलें. लौकिक प्रतिभेचे देणे आपल्याला जन्मतःच लाभले म्हणूनच जे कलाविषयक संशोधन आपल्या उत्तर आयुष्यांत करुन ज्ञानवादनतज्ञांना आपण स्तंभित केले, त्याची पूर्वकल्पना आपणास बाल्यावस्थेंतच झाली. ठाय, दुगुण, चौगुण इत्यादि त्रितालांचे गुण करतांना तीन, पांच, सात हे मधले गुण कां करण्यांत येऊं नयेत, असा थोर वादकांची मति कुंठित करणारा प्रश्न आपण आपले मातुल सुप्रसिद्ध तबलवय्ये कै. हरिश्चंद पर्वतकर यांना केला. त्यावेळीं ही गोष्ट सगळ्यांना अशक्य व हास्यास्पद वाटली. पण तिच्या चिंतनात आपण इतके व्यग्र होऊन गेलां कीं, सगळ्या लौकिक सुखांपासुन अलिप्त अशा वृत्तीने आपण संसारात वागूं लागलां, त्यामुळें आपले शेजारी पाजारी आपणास तुकाराम म्हणूं लागले. आहार, निद्रा इत्यादि नित्यकर्माचरणांत देखील आपणांस आपल्या ज्ञानात्मक प्रश्नाचा निदिध्यास लागला. अशा स्थितींतच आपण काहीं वर्षे कलेची अनन्य सेवा केली, तिचे फळ म्हणून लयभास्कर कलादेवता आपल्यावर प्रसन्न होऊन तिनें आपल्या विनम्र मस्तकावर वरदहस्त ठेवला, आणि आपणास प्रकाशाचें दर्शन झालें. असल्या मौलिक सिध्दांतानीं वादन शास्त्रांत क्रांति घडवून आणली. वादनशास्त्रांत अद्भूत चमत्कार आपण लिलया घडविले, आपली प्रतिभा इतकी परिणत झाली कीं आपण त्रितालाचे बत्तीस गुण करुं लागलां, एका मात्रेच्या सोळाव्या अंशाचे आपल्या प्रज्ञेला आकलन होऊं लागलें आणि वादन शास्त्रांतील कोणतीही बिकट कोडीं आपण सहजतेने उलगडून दाखवूं लागला. ज्याचावर कलेचें मंदिर उभारलें जातें त्या शास्त्राची आपण पुर्नघटना केली. त्यामुळें आपण आज केवळ कलावादनाच्या भूमिकेवर नसून कलाशास्त्रज्ञाच्या किंवा कलातत्वज्ञानाच्या उच्च भूमिकेवर आरुढ झालां आहां.

आपल्या ज्ञानाचा उत्कर्ष पाहून, अल्लादियाखां या सारख्या संगीत शिरोमणीनीं आपणास मानपत्र देऊन आपला गौरव केला आणि आनंदाने असे उद्‌गार काढले कीं, "लय व ताल या शास्त्रांतील ऋषिप्रणीत उज्वल परंपरा जी एका कालीं तुटली होती तिचें पुनरुज्जीवन आपण सध्या केलें आहे."

वरीलप्रमाणे कलेची सेवा करुन आपण चिरंतन कीर्ति मिळवीत गेलां, पण ज्ञानाच्या व लौकिकाच्या धुंदींत आपण चारित्र्याकडे दुर्लक्ष केलें नाही. इतकेच नव्हे तर आपण आपल्या वर्तनावरुन असें सिद्ध करुन दाखविले कीं, कलोपासकाच्या आत्यंतिक विकासाला ज्याप्रमाणे खडतर तपस्येची आवश्यकता आहे त्याचप्रमाणे निष्कलंक चारित्र्याचीही आहे. तात्पर्य, उज्वल प्रतिभा व दीर्घ तपस्या या दोहींच्या बळावर मिळवलेलं अगाध ज्ञान आणि धवल चारित्र्य या सर्वांच्या योगाने आपण आज कलेच्या इतिहासांत अनन्यसामान्य स्थान प्राप्त करुन घेतले आहे. त्याबद्दल आदर व्यक्त करुन आम्हीं गोमंतकीय आपल्यासारख्या थोर समाजबांधवाला आज ता. १४ नोव्हेंबर १९४२ रोजीं मडगांव येथें हें मानपत्र विनम्र भावानें अर्पण करुन आपणास या सुप्रसंगी 'तालकंठमणि' ही पदवी अर्पण करीत आहोंत.

**साभार**

("भारत" दिनांक-१७.३.१९४९)

# लयभास्कर खाप्रुमाम (लक्ष्मणराव) पर्वतकर

संगीत विश्वाच्या लयक्षेत्रात विशिष्ट कार्य करणारे लयभास्कर खाप्रुमाम पर्वतकर यांच्या स्मरणार्थ आज महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. हे खाप्रुमाम कोण? ताल व लय यांच्या व्यासंगात आपले अवघे आयुष्य घालवणारे हे लययोगी कोण? मी अभिमानाने सांगते हे माझे आजोबा.

'लयभास्कर' व 'तालकंठमणी' खाप्रुमाम पर्वतकरांचे सुपुत्र स्व. पं. रामकृष्ण पर्वतकर ह्यांची मी कन्या. मला आजोबाबद्दल एक लेख लिहिण्याबद्दल आग्रह केला, मी काय लिहिणार ? मी आजोबांवर लिहिलेले विद्वानांचे लेख वाचले. ते वाचल्यानंतर त्यांनी केलेल्या लयीच्या चमत्काराबद्दल वाचून माझी वाचाच बंद झाली.

डॉ. बी. आर. देवधरांनी घेतलेल्या साक्षात्कारानी त्यानी केलेले लयीचे आड, सवाईकी, दीडकी, कुआड, गोआड, भरतआड, ब्रह्मआड इत्यादिंचा उल्लेख आहे. प्रो. देवधरांनी त्यांना विचारले हे तुम्ही कसे करता तर खाप्रुमामनी इतक्या सुंदर व सोप्या भाषेत त्यांना समजावून सांगितले की चार मात्राचे तीन भाग पाऊण पट, चार मात्रात पाच म्हणजे सवापट, सहा म्हणजे दीडपट, सात म्हणजे पावणेदोन पट असे करता करता सोळा पटीपर्यंत पोहोचले व शेवटी शेवटी १७ ते ६४ पटीपर्यंत खाप्रुमामने करून दाखवले. हाताने कोणताही ताल सुरवात करून तोंडाने वेगळ्या वेगळ्या तालाचे बोलून दाखवले. हा जसे हाताने त्रितालाची टाळी देवून तोंडाने १६ मात्रेत कधी झपताल, कधी एकताल, धमार, सवारी म्हणून त्याची सम बरोबर त्रितालाच्या समेवर आणून दाखविली. हाताने सवारी तर तोंडाने धमारची वेगवेगळी लयकारी असे वेगवेगळ्या तालांबरोबर तिहाईसहित प्रयोग करून दाखविले. समेवर येताना कुठेही चूक नाही.

ह्याच्यापेक्षा मोठा चमत्कार म्हणजे दोन हाताने दोन वेगवेगळे ताल, दोन पायाने दोन वेगवेगळे ताल, टाळी खालीसहित वाजवून तोंडाने पाचवा ताल बोलताना सर्वांची सम एहे ठिकाणी दाखविणे किती कठीण कार्य ! विचार केला तर सगळं असंभव वाटतं पण लयब्रह्म योगी खाप्रुमामसाठी हे सर्व एका खेळाप्रमाणे आनंददायक व सोपे होते.

खाप्रुमाम गायन व सारंगीवादनातही पट्टु होते. १५.५ मात्रात अनेक तराणे रचून गानतपस्वीनी मोगुबाई तसेच आपले चिरंजीव रामकृष्णबुवा यांनासुध्दा शिकविले. खाप्रुमामने आपली लयकारीची विद्या आपले चिरंजीव रामकृष्णबुवा, डॉ. विश्वंभर पर्वतकर, डॉ. मलबाराव सरदेसाई, श्रीमती मोगुबाई कुर्डीकर इत्यादिना दिली. तबल्याचे शिक्षण श्री. गणपत पर्वतकर, नंदकुमार पर्वतकर, नरोत्तम पर्वतकर यानाही दिले. सारंगीवादनाचे शिक्षण बाळकृष्ण पर्वतकर व दत्ताराम पर्वतकर यांना दिले.

खाप्रुमामने आपले संपूर्ण आयुष्य लयीचा शोध घेण्यासाठी, त्यातील सूक्ष्म विभाग ह्यांच्यावर अधिकार करण्यासाठी खर्च केले. फक्त अधिकारच नाही तर ते विद्वानांना कार्यरुपाने करून दाखवण्याची, समजावून सांगण्याची क्षमताही त्यांच्यात होती म्हणून संपूर्ण भारतातल्या सर्व कलाकारांनी त्यांना एकमताने 'लयभास्कर' पदवी गानसम्राट अल्लादियाखाँ यांच्याहस्ते बहाल केली. त्यानंतरही त्यांना अनेक सन्मान मिळाले

पण त्या सन्मानांचे खाप्रुमामना अप्रूप नव्हते. ते त्या सन्मानांच्या पुष्कळ पुढे गेले होते. खाप्रुमामची भेट स्वामी विवेकानंदांशीपण झाली होते तेव्हा ते युवावस्थेत होते. स्वभावाने निर्मळ मनाचे, रहाणी साधी, बाहेरच्या तडक-भडक विश्वाशी काही संबंध नाही. लय हीच माता-पिता-गुरु. त्यांनी ही विद्या स्वतःच्या तपश्चर्येवर विकसित केलेली होती. ही त्यांची स्वतःचीच अर्जित विद्या होती. स्वतःच्या गुढ तपश्चर्येमुळे त्यांना ऋषी म्हणावे की योगी म्हणावे ? काय म्हणावे हा प्रश्न पडतो. ते आपले व आपल्या मातृभूमीचे नाव अजरामर करून लय तत्वात विलीन झाले व पुढच्या पिढीला एक सुखद संदेश देऊन गेले. साधना मार्गाने अंतर्मान प्रकाश दिसू लागतो व त्यात जीवनातील सर्व प्रश्नांची उत्तरे आपोआप सापडतात.

मी हा लेख मराठीत लिहिला आहे. मराठीत लिहिण्याची सवय नाही, भाषेत काही चुका असू शकतील. वाचकांनी त्यासाठी मला क्षमा करावी. मी खाप्रुमाम व माझे बाबा ह्या दोघांवर एक पुस्तक हिंदी भाषेत हिंदी वाचकांसाठी लिहित आहे. लवकरच उपलब्ध होईल.

**-डॉ. वनमाला रामकृष्ण पर्वतकर,**
ब-२५/33-९६, भेलापूर,
जवाहर नगर एक्स्टेंशन,
वाराणसी-२२१०१०

खाप्रुमाम
पर्वतकर
तालमहोत्सव

# खाप्रुमाम

खाप्रुजींचे उपनाव पर्वतकर. ते पर्वतावर राहणारे! गोव्यातील 'चंद्रेश्वर' पर्वताला लोक पर्वत म्हणतात. या पर्वताच्या माथ्यावर वीस-पंचवीस छोटी-छोटी घरे आहेत. अगदी शिखरावर महादेवाचे म्हणजे चंद्रेश्वराचे देऊळ आहे. तेथे उभे राहून पाहिले म्हणजे सबंध गोव्याचा आश्चर्यकारक देखावा नजरेसमोर उभा राहतो. पश्चिमेला समुद्राचा पट्टा, पूर्वेला पर्वताच्या निळ्या रेषा, जिकडे-तिकडे चकचकीत नद्यांचे जाळे, मिठागरे व शेते, मनसोक्त खाऊन आनंदाने पहुडलेल्या जनावरांप्रमाणे शोभणाऱ्या लहान-लहान टेकड्या, नारळाच्या राया, आकाशाचा ठाव घेणारी ख्रिस्ती मठांची शिखरे, हे सारे दृश्य इतक्या विविध रंगात आणि प्रकाशाच्या इतक्या विविध छटांत दिसायला लागते की, अपूर्व हर्षाची भावना आपल्या अंगात संचारते आणि वाटते, निसर्ग चिमुकला होऊन आपल्या पायांशी खेळत आहे! आपले हात आकाशाला टेकतात, पर्वताच्या उतरणीवर कललेल्या नारळींच्या झाडीचे पुष्ट हिरवे कवाळे आपल्या पायाला स्पर्श करण्याकरिता धडपडतात, बाजूला पाण्याची कुंडे आहेत, झरे आहेत.

सृष्टीच्या या दैवी एकांतात एका घरट्यात सतारीचे बोल घुमत आहेत, दुसऱ्यात घुमटावर पडलेली कठोर पण तालबद्ध थाप कडाडून उठत आहे. तिसऱ्या घरात गायिकेच्या गळ्यातून स्वरमाला सळसळून उठत आहे. चौथ्या घरात कलावंताच्या हाताने कुरवाळला जाणारा तबला जिवंत बोल काढतो आहे. पाचव्या घरात सारंगी आपला नाटकी विलाप करते आहे आणि जवळच घुंगरांचे पदाघात करीत नर्तकी लवलवते आहे. संसाराच्या कोलाहलातून दूर नव्हे उंच अशा या विलक्षण जागी कलांचा हा संसार पंचवीस घरांतून पन्नास-साठ माणसे मोठ्या ध्यासाने, निष्ठेने आणि निरपेक्षपणे नटराजाच्या सहवासात थाटून बसली आहेत. अशा या वातावरणात खाप्रुमाम जन्मले, वाढले आणि योगी झाले. होय, मी त्यांना योगीच म्हणतो. कलेच्या शास्त्राचा एवढा ध्यास घेतलेला माणूस क्वचित कोणी पाहिला असेल! भक्तिमार्गात जसा तुकाराम तसाच कलाशास्त्रात खाप्रुमाम! चंद्रेश्वराप्रमाणेच विरक्त नि त्यागी! त्याचाच मानवी अवतार! साधनेशिवाय तप नाही आणि तपाशिवाय कलेची प्राप्ती होऊ शकत नाही. खाप्रुमामांची साधना किती लोकविलक्षण! पहिल्यापासून व्यवहाराचे भान नाही, पैशांची पर्वा नाही, पोषाखाची क्षिती नाही! लहानपणी बाहेर जात तिथेच दोन-दोन तास हाताने ताल धरीत बसत. मग घरच्या माणसांनी हाक मारून त्यांना आणावयाचे. मी मडगावला असताना माझ्याकडे ते अधूनमधून यायचे तेव्हा मध्यरात्रीच्या वेळी जागृतावस्थेत किंवा निद्रावस्थेत, दोन्ही हात बिछान्याच्या दोन्ही बाजूंना कोणत्या तरी तालावर वरखाली व्हायचे!

या त्यांच्या नादाचा परिणाम असा झाला की, एकदा गंगाराम पर्वतकर नावाचा एक सारंगीवाला त्यांच्या शेजारी झोपला असताना 'भूत भूत' असे ओरडत उठला! घरची मंडळी जागी होऊन पाहतात तो खाप्रुमामांच्या हाताचा ठेका गंगारामाच्या पोटाच्या तबल्यावर पडत असलेला! इतकी तन्मयता त्यांनी गाठली तेव्हाच ते 'लयभास्कर' होऊ शकले! त्यांचे मन आणि त्यांची इंद्रिये ताललयींच्या नादात अहोरात्र वावरत. तसे पाहिले तर त्यांना



पुस्तकी शिक्षण अगदीच कमी होते. थोडे लिहायला वाचायला येत असे तेवढेच; पण चेहऱ्यावर पूर्वकालीन ऋषीचे तेज होते. डोळे आपल्या लयीच्या स्वप्नात तरंगत असलेले! चेहऱ्यावर रेषेरेषेतून विरक्तीची छटा उमटत आहे, हे बावळट वेषात शोभणारी त्यांची अलिप्त मुद्रा सिद्ध करायला समर्थ होती. त्यांनी लावलेले शोध जाणकारांना-देखील अशक्य वाटतात! त्यांना चमत्कार हेच नाव शोभेल. चमत्कार तर खरेच! पण खाप्रुमाम ते अगदी शास्त्रोक्त पद्धतीने करून दाखवीत.

या बाबतीत मी त्यांना एकदा एक प्रश्न केला तेव्हा ते म्हणाले, ''अंतर्यामी उजेड दिसतो, त्याच्या जोरावर होतंय!'' 'उजेड' या एकाच शब्दात 'Genius' ची व्याख्या सामावते. भौतिक शास्त्रांना न उलगडणारे चमत्कार आपण जगात थोडेथोडके पाहत नसतो. चोवीस तास जमिनीत पुरून घेणे हा काय चमत्कार नव्हे! केवळ हवापाण्यावर महिनेच्या महिने जगणारे सिद्ध पुरुष जगात अजून आहेत. तात्पर्य, कोणत्याही क्षेत्रात तपाची पराकाष्ठा झाली, आत्मिक बलाची वरचढ झाली, म्हणजे माणसाच्या हातून होणाऱ्या क्रियांचा उलगडा प्रकृतीच्या सर्वसाधारण ज्ञात नियमांनी होत नसतो. खाप्रुमामांचे चमत्कार ज्यांनी पाहिले असतील त्यांना असाच अनुभव आला असला पाहिजे.

पहिल्याच खेपेला मी त्यांना तबला वाजवताना पाहिले तेव्हा मला गुदमरल्यासारखे झाले. खाप्रुमामांची तालाशी जी झुंज चालली होती ती पाहिल्यावर माझ्यासारख्या अनभिज्ञालादेखील असे वाटले की, हे प्रकरण असाधारण आहे. पुराणात वर्णन केलेले 'कालियामर्दन' येथे चाललेले आहे. अदृश्य कालाला खेचून, ओढून, सैल सोडून, त्याच्या मुसक्या बांधून आपल्या इच्छेप्रमाणे त्याला वेगवेगळ्या तालांच्या चौकटीत कोंबणाऱ्या खाप्रुमामांची प्रचंड शक्ती पाहता पाहता प्रेक्षकाला घेरी येई.

खाप्रुजींची बुद्धी या क्षेत्रात चमत्कारकर्ती झाली आणि परंपरेने चालत आलेल्या तालात, आपल्या साधनेच्या बळावर त्यांनी नवनवीन शोधांची भर घातली! अल्लादियाखांसारख्या संगीतज्ञाने त्यांना 'लयभास्कर' ही पदवी देऊन त्यांचा जाहीर रीतीने सन्मान केला तो उगीच नव्हे! मोठमोठ्या मैफलीतताललयींची किचकट कोडी खाप्रुमाम लहान मुलांच्या उल्हासाने सोडवून दाखवीत. ते तालाची गणना करायला बसले, पायाचा किंवा हाताचा ठेका पडू लागला म्हणजे घड्याळाला आपली शिथिलता कबूल करावी लागे आणि वेगवेगळ्या मात्रांचे चार ताल जेव्हा एकाच देहाच्या चार अवयवांतून ते धरून समेवर येत तेव्हा मोठमोठ्या कलाकारांचा सारा अहंकार गळून जाई आणि ते त्यांच्या पायावर मस्तक ठेवीत!

पण एवढा महान प्रतिभेचा हा शास्त्रज्ञ किती निराभिमानी होता! ज्या दिवशी आम्ही काही मंडळींनी गोमंतकात त्यांचा सत्कार करून त्यांना मानपत्र दिले, त्या दिवशी सकाळी ही स्वारी अंगात एक अघळपघळ सदरा, एक आखूड धोतर, पायात तुटक्या वहाणा नि हातात एक बोचके अशा थाटात आमच्या घरी आली! त्यांना पाहून मला काय वाटले असेल याची कल्पना करा! समारंभासाठी त्यांना सजवून न्यावे लागले आणि मानपत्र घेताना स्वारी अशी अवघडली, लाजली, गांगरली की विचारूच नका. ते नेहमीच लोकांच्या गडबडीपासून दूर पळायचे. जाहिरातीपासून अलिप्त. नाव नको, कीर्ती नको, कोणी देऊ केली तर गोंधळून जायचे. जणू काय त्यावर आपला हक्क नाही, हे क्षेत्र आपले नाही.

खाप्रुमामांची कला पाहिल्यानंतर असे वाटे की, कलेच्या ध्यासात साऱ्या आवडी, इतर सारे षोक बुडवून टाकल्याशिवाय अत्युच्च कलेची प्राप्ती होत नाही. विरक्ती आहे तेथेच कलेचा परमोत्कर्ष आहे. साऱ्या ऐहिक गोष्टींचा कलेच्या उपासकाला विसर पडला म्हणजे नव्या दीप्तीने अंधारातील वाटा उजळतात, नवी क्षितिजे मोकळी होतात. आत्मविस्मृतीशिवाय ब्रह्मप्राप्ती नसते. देहभान हरपले म्हणजे भक्तांना परमेश्वर लाभतो. पैशाचा मोह सुटला, विषयापासून इंद्रिये निवृत्त होऊन त्यांनी कलेचा ध्यास घेतला म्हणजे श्रेष्ठ कला अवतीर्ण होते. गायन व वादन या कलांचा पायाच असा जो ताल व लय त्यात नवनवे शोध लावून खाप्रुमामांनी त्या कलेचे क्षितिज विस्तीर्ण केले. त्यांनी लावलेले शोध पुस्तकरूपाने प्रसिद्ध होतील तेव्हा या शास्त्रज्ञाची थोरवी लोकांना कळून येईल.

त्यांचे खरे नाव लक्ष्मणराव; पण गोवेकर त्यांना 'खाप्रुमाम' म्हणतात! खाप्रुमामांचा त्यांना केवढा अभिमान! त्यांच्या शिष्यत्वाची बिरुदे गोव्यातील खेड्यापाड्यातील सामान्य तबलजी, मृदंगीदेखील मिरवतात. खाप्रुमामांचे नाव कानावर पडले म्हणजे आमच्या खेडेगावाचा अंता देवळी छाती फुगवून म्हणायचा, ''माझं हे ज्ञान म्हणजे खाप्रुमामांचा प्रसाद!'' पर्वताच्या पायऱ्या न चढलेले तबलजीदेखील खाप्रुमामांच्या परंपरेवर आपला हक्क सांगतात. मग श्रीमती मोगूबाई कुर्डीकरांसारख्या तोलाच्या गायिकेने त्यांना वडिलांप्रमाणे मान द्यावा, यात नवल ते काय! कलावंतांच्या ठिकाणी जे हेवेदावे सामान्यपणे वास करतात, ते खाप्रुमामांच्या नामोच्चाराबरोबरच नष्ट होतात. गोमंतकीय कलाकार, मग तो कोणत्याही क्षेत्रातला असो, स्त्री असो किंवा पुरुष असो, वयाने लहान असो किंवा वृद्ध असो; खाप्रुमामा हे त्याला ऋषीसमान वाटतात हे सत्य आहे.

मृत्यूपूर्वी काही दिवस त्यांची शुद्धबुद्ध हरपली. पण जन्मभर मनाला व इंद्रियांना लागलेला ध्यास व सराव एवढा होता की, तशा त्या निश्चेष्ट अवस्थेतदेखील त्यांचा आत्मा ताल-लयीचा शोध घेत होता आणि त्यांचे हातपाय ताल धरीत होते!

साभार

**पुस्तकाचे नाव : गोमंत भारती**
(तृतीय भाषा-मराठी)
इयत्ता दहावी

**लेखकाचे नाव : लक्ष्मणराव सरदेसाई (१९०४-१९८६)**
प्रकाशक - राम वासुदेव भट,
सचिव, गोवा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
आल्त बेती-गोवा
पान : १७ ते २१

# खाप्रूजी पर्वतकर व स्वामी विवेकानंद

परिव्राजक जीवनात स्वामीजी गोव्यात गेल्याचा उल्लेख दुसऱ्या भागात आला आहे, पण तेथे विवेकानंदांच्या संगीताचा भाग वगळला होता तो येथे देत आहे. चरित्रकार लिहितात-'कवळे येथील श्री शांतादुर्गेच्या देवालयात स्वामीजींनी कालीमातेचे एक पद तालासुरात मधुर पण खड्या आवाजात गाऊन जमलेल्या लोकांना मंत्रमुग्ध करून सोडले; म्हाडदोळ येथील श्री म्हाळसादेवीपुढे त्यांनी सुंदर ख्याल गाऊन दाखवला; श्री मंगेश देवस्थानात कर्णमधुर ध्रुपद गायकी सादर केली; मडगावी श्री. सुब्रायबाबांच्या दिवाणखान्यात एकच चीज काही रागातून पाऊण तास गाऊन स्वामीजींनी सर्वांना आश्चर्यचकित केले.

स्वामी विवेकानंद तबलावादनातही निष्णात आहेत, हे पाहून त्यांचे यजमान श्री. सुब्राय यांनी गोमंतकातील तबला वादक श्री. लक्ष्मणराव पर्वतकर यांना आमंत्रण दिले. खाप्रूजी नावाने परिचित श्री. पर्वतकर आधुनिक भारतीय संगीतातील एक महान विभूती होते. १९४५ साली मुंबईतील संगीतप्रेमी मंडळींनी श्री. खाप्रूजींचा सत्कार केला. मरहूम उस्ताद अल्लादिया खाँसाहेबांनी त्यांना 'लयभास्कर' ही पदवी त्या समारंभात दिली. अशा लयभास्कराचे तबलावादन ऐकून स्वामींनी त्यांची खूप वाहवा केली. मग म्हणाले, ''लाकडी खोक्याच्या कडेवर बोटे फिरवून जसा नाद उमटतो तसाच नाद वरच्या चामड्यावरूनही निघू शकतो. होय ना?'' खाप्रूजींना ते पटले नाही. ते मृदू स्वरात म्हणाले, ''स्वामीजी, आपण माझी थट्टा तर करीत नाही का?'' स्वामीजींनी उत्तर देण्याऐवजी तबला पुढ्यात घेतला आणि तबल्याच्या चामडीतून (म्हणजे पोकळ भागातून) तसाच आवाज काढून दाखवला जसा कडेच्या लाकडी भागावरील चामड्यातून उमटतो. श्रोते गारीगार झाले. खाप्रूजींनी क्षमा मागून स्वामींना नमस्कार घातला.

गोमंतकातील स्वामीजींचे गायन व तबलावादन याविषयी भरपूर संशोधन करून एका चरित्रकाराने वरील माहिती उपलब्ध करून दिली आहे. स्वामीजी १८९२ च्या ऑक्टोबरात गोमंतकात असण्याची शक्यता आहे. तथापि, खाप्रूजींचे वय त्यावेळी काय असावे? ते तरुण होते का? प्रा. बी. आर. देवधर आपल्या 'थोर संगीतकार' या ग्रंथात खाप्रूजींचा जन्म १८८० सालचा असावा, असे म्हणतात. त्यांचे वाक्य असे-'त्यांचा जन्म १८८० सालचा होता असे त्यांच्या जवळच्या नातेवाइकांकडून समजले.' (पृ. २५६). हे खरे असल्यास १८९२ मध्ये खाप्रूजी फक्त १२ वर्षांचे असणार व वर वर्णित घटना संभवत नाही. पण प्रा. देवधरही खाप्रूजींच्या जन्मसालाबाबत ऐतिहासिक पुरावा देत नाहीत. 'नातेवाइकांकडून समजले' असे ते लिहितात. तरीही, विवेकानंद व लक्ष्मणराव पर्वतकर यांची भेट झाली होती का? हा आजही संशोधनाचा विषय आहे.

साभार
**पुस्तकाचे नाव: योद्धा संन्यासी**
लेखक: वसंत पोतदार
प्रकाशक: दिलीप माजगावकर
राजहंस प्रकाशन, १०२५,
सदाशिव पेठ, नागनाथ पार, पुणे - ४११ ०३०
पान : ३०१ ते ३०२



# लयभास्कर खाप्रूजी पर्वतकर

गोमंतकीय गायक स्त्रियांच्या कथा भोबे यांनीच आपल्या अनेक पुस्तकांतून लिहिल्या आहेत. त्या आठवत मी उभा होतो एका लयभास्कराच्या दारात. चंद्रनाथ पर्वतावर. पारोड्याच्या चंद्रनाथाचे दर्शन घेतले व पर्वत गावात हिंडत होतो, तर कुणीतरी म्हणाले, ''लयभास्कर खाप्रूजी पर्वतकर हे इथले. इथं त्यांचं घर आहे. इथं त्यांचं स्मारक आहे.''

त्या पर्वताच्या मातीतून तबल्याचे तुकडे ऐकू येत आहेत असे क्षणभर वाटले. गोव्याच्या पद्धतीचे एक साधे घर, पाऊस ओतून टाकणाऱ्या कौलांचे. पुढच्या बाजूला व्हरांडा, आत खोल्या. लयब्रह्मभास्कर म्हणून ज्यांचे नाव भारताच्या संगीतक्षेत्रात सारंगीसारखे दुमदुमले ते खाप्रूजी पर्वतकर येथेच जन्मले, येथेच निवर्तले. त्यांच्या घरात हिंडलो, भिंतीवरची जुनी चित्रे पाहिली, काही गोळा करून आणली, गोव्याच्या संगीत परंपरेची सोनेरी पाने उलगडतो आहे असे ते सारे पाहताना वाटले.


लयभास्कर खाप्रुजी पर्वतकर यांनी तबलावादनात असंख्य चमत्कार करून दाखवले. त्या मुखड्यांचा विचार करताना गोव्यातील वास्तव्यात अनेकदा ऐकलेल्या गानपरंपरेच्या कथा नजरेसमोर येत होत्या. चंद्रनाथ डोंगरावरील त्या मंदशीतल वाऱ्यावर अनेकांच्या गायनाचे सूर ऐकू येत होते. गोव्याची गायिका बाहेर गायल्याची पहिली नोंद पेशवाईतील आहे. १७७० मध्ये मोहना पालकर ही गायिका व नर्तिका सातारचे राजे भेटीस आले, त्या वेळच्या सोहळ्यात नाचली व गायली. गायन कला शिकण्यासाठी, ती आत्मसात करण्यासाठी गोव्याबाहेर पाऊल टाकणारा पहिला गायक मुरारबा पेडणेकर. १८६० मध्ये तो लखनौला गेला आणि त्याने घरंदाज गायकी आपल्या घराण्यात आणली. अनेक वाद्यांवर त्यांचा लयकारी हात फिरे. त्याने स्वरशृंगार हे तंतुवाद्य स्वतः तयार केले होते. सरोद, तानपुरा, सतार व सारंगी या चारही वाद्यांचा मिलाफ या वाद्यात घडविला होता.

परंतु गोव्याला अखेर संगीतमय केले ते कलावंत समाजाने. येथील श्रीमंतांनी जे षोक केले, तोच स्वैर जीवनानंद लुटण्यासाठी जे बाहेरून गोव्यात आले, त्यांमधून येथे कलावंतिणींचा समाज निर्माण झाला. देवापुढे त्यांनी दिवे पेटविले, त्या देवदासी बनल्या, परंतु संगीताला त्यांनी पुढे आपल्या अमोल गायनतपश्चर्येने दास बनविले. मुंबईतील बड्याबड्यांच्या आश्रयाने गोमंतकीय कलावंतिणी तेथे राहिल्या. परंतु त्यांच्या अशुद्ध जीवनातही शुद्ध व शास्त्रीय संगीताची जी सेवा केली, आपल्या अप्रतिष्ठित आयुष्यालाही गायकीच्या घरंदाजपणाचा जो साज चढविला त्याला कलाक्षेत्रात तरी तोड नाही. गोपालकृष्ण भोबे अशा जुन्या गोमंतकीय गायिकांच्या आठवणी रंगून सांगे. बाबलीबाई गायला बसली की तिच्यानंतर दुसऱ्याने गायचे नाही, असा तिचा शिरस्ता होता. सव्वासहा फूट उंचीचा तिचा देह होता. दोन कोंबड्या म्हणे ती खात असे. चौदा तास ती रियाज करी आणि गायला बसली की आपल्या मर्दानी व पल्लेदार आवाजाने ती सारा दरबार जिंकत असे. बडोद्याच्या महाराजांनी तिला गाण्यास बोलाविले व तिचे पहिले गाणे ठेवले. नंतर आणखी कुणी गाणार होते. परंतु बाबलीबाईने जो स्वर लावला तो धुंद करीत आसमंत व्यापून राहिला. ''माझ्या एका कानशिलात सम असते, आणि

दुसऱ्यात ताल असतो'', असे बाबलीबाई अभिमानाने सांगे व देशातील नामवंत गवय्यांना तिने आपल्या चरणी मस्तक नम्र करण्यास लावले होते.

मडगावच्या पलीकडे कुडचडे व नंतर काकोडे हे गाव आहे. त्या काकोड्याच्या तीन गायक भगिनी तर अशा होत्या की एका वेळेस गाण्यास बसल्या तर सूर कुणी धरला आहे हे कळू नये. पहिलीचा दम श्वास सुटेपर्यंत दुसरी सूर धरे व त्यानंतर तिसरी आपला सूर त्यात असा मिसळे की पहिलीचाच सूर मिनिटेन मिनिटे चालू आहे असे वाटावे. सरस्वतीबाई वेलिंगकर ही ठुमरी अशी गायची की शब्दांचे पुष्पगुच्छ होऊन आपल्या अंगावर कुणी फेकीत आहे, असे ऐकणाऱ्याला वाटावे. त्यानंतर मुंबईत गाजली ती बापू-ताराची कोठी. बापूबाई व ताराबाई या बहिणी गोव्याच्या. आडनाव वेलिंगकर. गुणी व श्रेष्ठ कलावंत तेथे आपली मर्जी पेश करून जाई. उत्तर भारतातील नामवंत गायकांनी तिथे आपली हजेरी लावली. संगीतसम्राट अल्लादियाखाँ बापू-ताराच्या कोठीवर गाण्यात भूषण मानत, अब्दुल करीमखाँसाहेब, गौहरखान, मल्काजान, नजीरखाँ या साऱ्यांनी आपल्या संगीताचे दरबार या कोठीवर फुलविले. नर्तक कन्हैयापासून नृत्यसम्राट अच्छन महाराजांपर्यंत साऱ्यांच्या पायातील नूपुरांनी या कोठीला झुमझुमत ठेवले. अंजनीबाई मालपेकरांचे सुरेख संगीत याच कोठीने प्रथम ऐकले व ते अनंत दिशांना पसरत गेले. काय तपश्चर्या या गायिकांनी संगीतासाठी केली. नजीरखाँसाहेबांनी अंजनीबाई मालपेकरांना नुसता यमन कल्याण पाच वर्षे शिकविला, तर भैरवी दोन वर्षे शिकविली. तीव्र व कोमल अशा दोन्ही स्वरांवर गायक पूर्ण स्वार झाला पाहिजे हा हेतू!

या साऱ्या संगीत-परंपरेचा बादशहा म्हणजे खाप्रूजीमाम पर्वतकर. पर्वतकरांचे घर आठवले की मला मोगूबाई कुर्डीकरांचेही घर आठवते. कुर्डी गाव येते सांग्याच्या पलीकडे व हे सबंध कुर्डी गाव नव्या साळावली धरणाखाली आता बुडणार आहे. ''गाव वाहून गेलं, नाव राहून गेलं'' असे 'राजसंन्यासा'त संभाजीराजे साबाजीला सांगतात. कुर्डी गाव वाहून गेले तरी मोगूबाई कुर्डीकरांचे गाणे अखंड घुमत राहणार आहे. खाप्रुजी पर्वतकरांसारखेच मोगूबाईंचे घर. त्याही कलावंत समाजातील. या साऱ्यांनी संगीताचे महाल उभारले, पण त्यांच्या जुन्या राहत्या घरांना आज अवकळा आली आहे. गायन कलेसाठी आपली राहती घरे या कलावंतांनी सोडली. मोगूबाई कुर्डीकर तर वणवण फिरल्या. या चंद्रनाथ डोंगरावर एक भूतनाथाचेही देऊळ आहे. त्या काळी चंद्रनाथ भूतनाथ नाटक मंडळीत गाणे शिकायला मिळेल म्हणून मोगूबाई कुर्डीकर सामील झाल्या. त्यांच्या समकालीन केसरबाई केरकर याही गोव्याच्या. मोगूबाई कुर्डीकर, केसरबाई केरकर आणि खाप्रूजीमाम पर्वतकर या तिघांची नावे घेतली की गायनकलेतील व शास्त्रातील सर्वोत्कृष्ट ते सर्व आले. अल्लादियाखाँसाहेबांनी या दोघींनाही आपली सारी कला दिली. केसरबाई केसरकर सूरश्री झाल्या, परंतु त्यासाठी ३० वर्षे त्या नुसते गाणे शिकत होत्या. पहाटे पाच वाजता उठून मंद्रसाधना करावी लागे व खाँसाहेबांची तब्येत लागली तर दिवसभर गात राहावे लागे. मोगूबाईने अशाच संगीतसाधनेसाठी गुरूचा पाठलाग केला व अल्लादियाखाँची लयप्रधान गायकी आत्मसात केली. खाप्रूजी



पर्वतकरांनीही मोगूबाईंच्या लयकारीचे अपरंपार कौतुक केले. या सर्वांना खाप्रूजींनी पाठ थोपटली की सार्थक झाल्यासारखे वाटे. असे हे तबलिये खाप्रूजीमाम पर्वतकर होते तरी कोण, असा प्रश्न मला नेहमी पडे. गोव्यात त्यांची पुण्यतिथी आठवणीने होते. त्यांचे घर पाहिले व त्यांचे चरित्र मी शोधू लागलो.

''डोक्यावर करड्या रंगाची चपटी टोपी, बंद गळ्याचा पारशी फॅशनचा कोट, धोतराचे साधे नेसण आणि कोल्हापुरी चपला, चेहऱ्यावरच्या पांढऱ्याशुभ्र मिश्या पहिल्याप्रथम लक्ष वेधून घेणाऱ्या'', असे त्यांच्या व्यक्तित्वाचे वर्णन गोपाळकृष्ण भोबे यांनी आपल्या 'कलात्मक गोमंतक' मध्ये केले आहे. १८७८-७९ च्या सुमाराचा त्यांचा जन्म. सुरुवातीस खाप्रूजी पर्वतकर सारंगी वाजवीत असत. पर्वतावर कलावंत समाजात सतत गायन-वादन चाले. त्यांनी खाप्रूजींचे कान तयार झाले व मन गुंतले ते स्वरांपेक्षा लयीत. स्वर हा अभ्यासाने आत्मसात करता येतो, परंतु लय उपजत असावी लागते असे संगीतशास्त्रज्ञ सांगतात. खाप्रूजी पर्वतकरांच्या मनात आणि हाताच्या बोटात लय जणू साकार झाली होती. सारंगी व पखवाज वाजविता वाजविता खाप्रूजींच्या हाती तबला आला व या लयीचा जणू त्यांना या वाद्यात साक्षात्कार घडला. या लयीची जर समप्रमाणात दुगण, तिगण, चौगण करता येते तर हाच प्रकार विषम प्रमाणात का करता येऊ नये, असा प्रश्न त्यांच्या मनाला पडला व त्यामधून या लयभास्कराचा जन्म झाला. त्यांचे सारे व्यक्तिमत्त्व, सारे शरीर या लयीत इतके लीन झाले की त्यांना वेड वगैरे लागते की काय, अशी भीती कुटुंबीयांच्या मनात निर्माण झाली.


खाप्रूजी पर्वतकरांच्या कर्तृत्वाची पहिली सलामी झडली ती पंडित विष्णू दिगंबरांनी १९१९ मध्ये भरवलेल्या संगीत परिषदेत. पर्वतकरांनी आपल्या तालशास्त्रातील काही अवघड कोडी तिथं प्रथम उलगडली तेव्हा या भारतवर्षातील उज्ज्वल कीर्तीचे तबलिये व पखवाजी खाप्रूमामांना कुर्निसात करण्यासाठी उभे राहिले. १९२१ साली भास्करबुवा बखले यांनी जमविलेल्या मैफलीत खाप्रूजी पर्वतकरांनी लयकारीच्या लीला प्रकट केल्या तेव्हा भास्करबुवा बखले म्हणाले, ''लयशास्त्रात आपण प्रभू आहात!'' त्यांची सत्त्वपरीक्षा उत्तर भारतीय गायकांनी जाणूनबुजून घेतली ती १९३३ मध्ये. मुंबईतील एका मोठ्या मैफलीत, संगीतसम्राट अल्लादियाखाँसाहेब, खाँसाहेब विलायत हुसेनखाँ, फैयाजखाँ असे नामवंत गायक व त्यांच्या साथीला नावाजलेले तबलिये व तंतूकार हजर होते. त्यापैकी एकाने खाप्रूजी पर्वतकरांची थट्टा उडविण्यासाठी, ''तुम्ही बारा मात्रांच्या तेरा समान करून बारा मात्रांच्या लयीत ठेका बांधा'', असे सुचविले. खाप्रूजी पर्वतकारांनी अगदी सहजपणे तेरा मात्रात ठेका तर बांधलाच, पण त्यातही तिहायी टाकून ठेका पुरा केला. संगीतसम्राट अल्लादियाखाँसाहेब गहिवरले आणि 'तोबा तोबा' म्हणत त्यांच्याजवळ गेले व म्हणाले, ''आपके ज्ञान के सामने सौ बार सर झुकाता हूँ!'' एकदा एका मैफलीत त्यांनी साडेतेरा मात्रांच्या ठेक्यात तीन धांची तिहायी टाकून ठेका बांधून दिला. एक लय घेऊन तिची निमपट, पाऊणपट, सव्वापट, दीडपट, पावणेदोनपट करून मग त्यात अर्धी मात्रा मिसळणे, पावमात्रा मिसळणे असा उद्योग करीत ते बसत. हा विषय माझ्या आकलनाबाहेरचा. म्हणून गोव्यातील काही हौशी तबलियांकडून तो समजून

घेण्याचा मी प्रयत्न केला. अनेकांनी त्यापैकी काही भाग करून दाखविला व मग पुढे म्हणत, ''यापुढचे आम्हाला येत नाही, म्हणून तर खाप्रूजीमाम मोठे.'' पावणेसोळा मात्रांचा 'परब्रह्मताल' ही त्यांची अपूर्व अशी एक निर्मिती. ताल त्यांनी अष्टांगपरिपूर्ण केला. या पावणेसोळा मात्रांच्या तालात १२५ 'धा' असलेली 'महासुदर्शन' नावाची तालशास्त्रातील अत्यंत कठीण अशी परान त्यांनी बांधली. पुढे पुढे साथ करणे हे त्यांचे कार्यक्षेत्र उरलेच नव्हते. लयींच्या तुकड्यातुकड्यांशी खेळत ते अहोरात्र बसत किंवा कुणी शिकण्यासाठी आला तर त्याला संग्रही असलेल्या हजारो मुखड्यातील काही मुखडे देत. पूर्वी उत्तर भारतात दोन गायक घराण्यात कुणाचा विवाह असेल तर लग्नसमारंभात भेट म्हणून आपल्या घराण्यातील काही खास चिजा देत. ही कल्पनाच मोठी भव्य आहे. खाप्रूजी पर्वतकर मुंबईला असत किंवा गोव्याला आले की पर्वतावर. तिथं मुखडे उधळत खाप्रूजी बसत किंवा आपल्या आवडत्या लयीशी त्यांचा खेळ चाले. तबल्यांचे एक घराणे खाप्रूजी पर्वतकरांनी जन्माला घातले. पण ते घराणे काही उभे राहिले नाही. कारण ती तपश्चर्या करणारे तबलिये मिळाले नाहीत. १९३६ मध्ये श्रीमती मोगूबाई कुर्डीकरांनीच खाप्रूमामांचा एक पुतळा तयार केला व त्यांना सत्कारपूर्वक भेट म्हणून दिला. त्यावेळी 'अफताबे मूसिकी' लयक्षेत्रातील तळपता सूर्य असा किताब त्यांना हैदराबादच्या घरंदाज उस्तादांनी दिला. १९३९ मध्ये मुंबईच्या कलावंतांनीही त्यांचा सत्कार केला.'यंग इंडिया' या जुन्या ग्रामोफोन कंपनीने त्यांच्या काही ध्वनिमुद्रिका घेतल्या होत्या. त्याही आता अस्तंगत पावल्यासारख्याच आहेत. 3 सप्टेंबर १९५3 रोजी हा लयभास्कर आपल्या पर्वतावरच या कलावंतांच्या भूमीत लीन झाला. ''ओ तो लय का अवलिया था'', असे ज्यांचे वर्णन तिरखवाँनी केले, त्यांची स्मृती एका तुळशीवृंदावनाच्या रूपाने आज तिथे उभी आहे. धाक् तिक्, तिक् धा, तिक् धा, धा तिक् असा तबल्याचा टणत्कारी ताल सबंध आसमंतात घुमतो आहे, असे तिथे समोर उभे राहिल्यावर वाटत होते. गोव्याच्या एकूण कलावती जीवनाला ज्याने ताल दिला, ज्याने संगीताच्या या मुशीला लय दिली, ज्याने श्रोत्यांच्या रसिकतेला मुखड्यांचे मोल दिले, ते लयभास्कर खाप्रूजी पर्वतकर कदाचित उद्या विसरलेही जातील. चंद्रनाथ डोंगर उतरून मी खाली आलो, तेथील चंद्रनाथाला मी क्षणभर विसरलो होतो, वाटत होते अजून पर्वतावरची मैफल संपलेली नाही. खाप्रूजी पर्वतकर कदाचित आज साथीलाही बसतील.


साभार

**पुस्तकाचे नावः असा हा गोमंतक**

लेखकाचे नावः माधव गडकरी<br>
प्रकाशकः अशोक केशव कोठावळे<br>
मॅजेस्टिक प्रकाशन, ८ फिनिक्स,<br>
तिसरा मजला, ४५७ एस. व्ही. पी. रोड,<br>
गिरगाव, मुंबई ४०० ००४.<br>
पान : १९९ ते २०३

# लयभास्कर पर्वतकर

''राम, गेले पंधरा दिवस आपण बुवांची भेट घ्यायला इथं आलो आहोत; पण त्यांची भेटही होत नाही की मुलाखतीची वेळही मिळत नाही. काय करायचं? किती दिवस वाट पाहायची? माझी कामं अडलं आहेत मुंबईला सारी.'' दीनानाथने रामपाशी तक्रार केली.

अशी दीनानाथ यांनी तक्रार करणे स्वाभाविक होते. कारण मुंबईतील एक प्रथितयश गायक म्हणून त्यांनी नाव मिळवले होते आणि अशा वेळी इतके दिवस मुंबईच्या बाहेर राहणे त्यांना परवडण्यासारखे नव्हते. खरे तर तो रामबरोबर गोव्यात त्यावेळी यायलाच तयार नव्हता; पण मित्राचा आग्रह त्याला मोडवेना आणि शेवटी पंधरा दिवसांपूर्वी ते गोव्यात आले ते केवळ रामला प्रख्यात पखवाजवादक लयभास्कर पर्वतकरांचा शागीर्द म्हणून प्रवेश मिळवायला. पण पंधरा दिवस झाले तरी बुवांची भेट तर जाऊ द्या, त्यांच्या जवळही जायला मिळत नव्हते. त्यांची हवाही अंगाला लागत नव्हती.

''दीनानाथ, तुझी अडचण मला समजते. तुझे फार मोलाचे पंधरा दिवस तू माझ्यासाठी इथ घालवलेस. तुझं मुंबईत राहणं आवश्यक आहे, हे मी जाणतो. पण इतके दिवस कळ काढली ती फक्त एक दिवस काढ. उद्या श्रावण सोमवार आहे. उद्या ते निश्चित मंगेशाच्या पूजेला येतील. तेव्हा जर त्यांची भेट झाली नाही तर मग आपण मुंबईला वापस जाऊ. आय प्रॉमिस.'' मित्राने वचन दिल्यावर दीनानाथ यांना थांबणे आवश्यक होते. शिवाय प्रश्न एका दिवसाचाच होता. दुसऱ्या दिवशी श्रावण सोमवार, मंगेशाच्या देवळात गर्दी होतीच होती; पण अकराच्या सुमारास लयभास्कर पर्वतकरांनी देवळात महादेवाच्या पूजेला प्रवेश केला.

बुवांचा थाट बघण्यासारखा होता. त्यांच्या सावळ्या सतेज उघड्या शरीरावर रेशमाचे जांभळे नवे कोरे सोवळे आणि अंगावर पिवळी गर्भरेशमी शाल होती. हातात पूजेच्या साहित्याने भरलेले चांदीचे ताट होते. दुसऱ्या हातात गंगाजलाने भरलेला चांदीचा तांब्या होत्या आणि मागे त्यांचे शागीर्द नम्रतेने व आदराने अंतर राखून चालत होते.


बुवा गाभाऱ्यापाशी येऊन थांबले. आत गाभाऱ्यात कुणीतरी बऱ्यापैकी पखवाज वाजवत होता. एकदोनदा त्यांनी त्या वाजवण्याला दादही दिली; पण दुसऱ्याच क्षणी एक मात्रा चुकली. त्यांच्या भिवया वर झाल्या आणि चेहरा क्रोधाने लाल झाला. हातातला चांदीचा तांब्या त्यांनी गाभाऱ्याच्या दिशेने फेकला, ''कोण महामूर्ख असा चुकीचा पखवाज भगवान शंकराच्या सेवेत वाजवतो आहे?'' गाभाऱ्यातून राम आणि दीनानाथ बाहेर आले.

''जो बाज तू वाजवत होता तो तर चंद्रावतबुवांचा आहे.''

''हो, मी त्यांच्याकडूनच थोडंथोडकं शिकलो आहे.''

''पण वाजवताना एक मात्रा चुकली तुझी.''

''बरोबर आहे. मी जाणूनबुजूनच ती चूक केली. मला तुमचं लक्ष वेधायचं होतं. तुमच्याकडून शिकायला मी गोव्यात आलो; पण पंधरा दिवसांपासून आपली भेटच होत नाही. म्हणून मला ही



युक्ती करावी लागली.''

बुवांनी डोळे बारीक करून रामकडे बारकाईने पाहिले.

''पखवाज हे भगवान शंकराचं वाद्य आहे. ते शिकून बाजारात पैसे कमवायचे आहेत वाटतं?' ''नाही हुजूर. मी मसाजिस्ट आहे. स्पंदनातून रुग्णांना मसाज करायचा ही माझी पद्धत आहे. सारी स्पंदनं मेरुदंडातून शरीरात जातात. कुंडलिनी जागृतीसुद्धा स्पंदनांच्या जागृतीतून होते. माझ्या रुग्णसेवेला मदत व्हावी म्हणून मी पखवाज शिकून स्पंदनांचं रहस्य आपल्याकडून अवगत करू इच्छितो.''

बुवा तृप्त झाले, ''कोण आहे रे तिकडे, गंडा आण.''

त्यांचे शागीर्द धावले व त्यांच्या हातात एक गंडा दिला. समारंभपूर्वक गंडाबंधनाचा विधी झाला आणि राम त्या दिवसापासून बुवांचा शिष्य झाला. रामला कृतकृत्य झाल्यासारखं वाटले. फार दिवसांची त्यांची महत्त्वाकांक्षा आज फलद्रूप झाली होती.

लयभास्कर पर्वतकरबुवांचा शागीर्द होता येणे ही काही सामान्य प्राप्ती नव्हती. संगीताच्या क्षेत्रात त्या काळात बुवांसारखा पखवाजवादक नव्हता. पखवाजवर त्यांची थाप पडली की ऐकणाऱ्यांच्या अंगात वीज संचारली नाही, असं कधी झालं नव्हतं. त्यांच्या हातात तरुण युवतीच्या पदन्यासातील कोमलता होती तसाच विद्युल्लतेचा कडकडाटही होता. क्रोधायमान भगवान शंकराच्या प्रलयकालीन डमरूचा गडगडणारा नाद होता, तसाच मंद वाऱ्याच्या झुळकेने हलणाऱ्या कोवळ्या पानांची सळसळपण होती.

चांगल्या चांगल्या वादकांचा घाम काढेल आणि त्यांचा कस घेईल असा एकशे पंचवीस मात्रांचा ''चक्रपरान'' (पर्णबोल) बाज वाजवणे आणि तोसुद्धा प्रभुत्वाने, हे केवळ बुवांनीच साध्य केले होते. बुवा त्यावेळी कीर्तीच्या शिखरावर होते.

रामची बुवांबरोबर भ्रमंती आणि शिक्षण एकाच वेळी सुरू झाले. सोबतीला इतर शागीर्दही अर्थात असायचे. फिरता फिरता बुवा आपल्या परिवारासह, साऱ्या हिंदूंचे आणि शिवप्रेमिकांचे पूजास्थान असलेल्या पशुपतिनाथाला पोहोचले. गर्दीचे दिवस होते तरी कशीबशी मंदिराजवळच्याच धर्मशाळेत त्या सर्वांना जागा मिळाली.

कलाकार आणि वैभवसंपन्नता हे समीकरण त्यावेळी जन्माला आले नव्हते आणि सरस्वती व लक्ष्मीची मैत्रीही झाली नव्हती. कलेत परमोच्च स्थान मिळवले, रसिकांकडून प्रचंड वाहवा मिळवली म्हणून कलाकार श्रीमंत होईल किंवा असेल असे नव्हते. बहुतांश कलाकार गरीब या सदरातच मोडणारे असायचे; पण दीनवाणेपणा मात्र कुणातच नसायचा. तसेच हात पसरणेसुद्धा कुणाच्या स्वप्नातही नसायचे.

पर्वतकरसुद्धा या नियमाला अपवाद नव्हते. ते कलेत लक्षाधीश होते, मनाने श्रीमंत होते, हाताने सढळ होते. कुणाही शागीर्दाला विद्या शिकवताना त्यांनी विद्या चोरून ठेवली नव्हती; पण आर्थिक बाजू कमालीची दुर्लक्षित होती. गरिबी वा पैशाचा अभाव पाचवीला पुजलेला. शिवाय आपल्या कुटुंबाबरोबर सोबतच्या शागीर्दांना, शिष्यांनाही पोसायची नैतिक जबाबदारी असल्यामुळे कधी कधी फार कठीण प्रसंग ओढवे.

नेपाळमध्येसुद्धा पहिले काही दिवस पशुपतिनाथाच्या मंदिरात मिळणाऱ्या प्रसादावर त्या सर्वांची गुजराण झाली; पण नंतर बाका प्रसंग निर्माण व्हायला लागला. गुरूला शिष्यांच्या पोटाची तर शिष्यांना गुरूच्या पोटाची चिंता सतावायला लागली. दोघांनाही परस्परांची कुतरओढ आणि जिवाला लागलेला घोर पाहवत नव्हता.

असाच एक दिवस होता. दुपारचे बारा वाजले असतील. तेवढ्यात मंदिरात गलका झाला की नेपाळचे महाराज देवळात येत आहेत. पुजाऱ्यांनी आणि रक्षकांनी साऱ्यांना बाजूला केले. भाग्याने म्हणा किंवा योगायोगाने राम पोरगेलासा वाटल्यामुळे त्याला तिथेच दरवाजात उभं राहायची संधी मिळाली.

नेपाळचे महाराज त्यांच्या लवाजम्यासकट मंदिरात आले आणि मंदिरात प्रवेश करताना त्यांची नजर रामवर पडली. ते क्षणभर थबकले. डोळे बारीक करून त्यांनी रामकडे पाहिले आणि आत चालत गेले.

दर्शन घेऊन परतताना ते पुन्हा रामपाशी थांबले, ''मि. भोसले, व्हॉट यू आर डुईंग हिअर?''
''महाराज, मी माझे गुरू प्रख्यात पखवाजवादक लयभास्कर पर्वतकर आणि माझ्या गुरुबंधूसोबत काही दिवस भगवंताच्या सेवेसाठी आलो आहे.''

''राहता कुठे?''

''इथंच. मंदिराच्या धर्मशाळेत.''

''किती जणं आहात?''

''आहोत चौघे जण.''

''जेवायची काय सोय आहे तुम्हा सर्वांची?''

आता मात्र रामची नजर खाली गेली. सत्य बोलता येत नव्हते आणि दयेची भीक मागणे त्याच्या रक्तात नव्हते.

''ठीक आहे. तुम्ही सारेजण रोज राजमहालात जेवायला येत जा. तुमची सोय होईल. मी आदेश देतो तसा.''

रामने क्षणभर विचार केला आणि म्हणाला, ''महाराज, आपली सद्भावना आम्ही समजतो आणि तिचा स्वीकारही करतो; पण माझे गुरू स्वाभिमानी आहेत. त्यांना असं रोज महालात येऊन जेवण घेणं आवडणार नाही. श्रेष्ठ कलाकारांच्या मनोभूमिकेशी आपण चांगलेच परिचित आहात.''

महाराजांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. ''व्हेरी गुड. मला आवडलं तुझं बोलणं. तुम्हा चौघांना इथंच रोज दोन्ही वेळा महालातून जेवणाचा डबा मिळेल.'' त्यांनी जाता-जाता आपल्या सचिवाला आदेश दिला.

बुवांना हा वृत्तांत समजला. त्यांनी उत्सुकतेने विचारले, ''राम, नेपाळच्या नरेशांशी तुझा परिचय कसा?''

''गुरुजी, मुंबईला त्यांना मी मसाज दिला होता.'' रामने थोडक्या
आणि बढाई न मारता सत्य सांगून टाकले.

दुपारी जेवणे झाली. सारे आराम करत होते आणि रामने बुवांना



विचारले, ''गुरुजी, संगीतामध्ये अपार शक्ती आहे. दीपराग लावून दिवे लावता येतात, चराचराला संमोहित करता येतं हे खरं आहे का?''

''अलबत. शंभर टक्के खरं आहे; पण त्यासाठी संगीताची साधना ही एक दैवी आराधना म्हणून करावी लागते. तिथं मानमरातब, पैसाअडका, वैभव, लोकेष्णा यांचा रतीभरही स्पर्श व्हायला नको. तेव्हा कुठे संगीतात दिव्यत्व आणि चैतन्य यांचा संचार होतो.''

बुवांनी नंतर बरीच उदाहरणे दिली आणि विषय तिथेच संपला.

त्या रात्री पशुपतिनाथाच्या मंदिरात फारशी गर्दी नव्हती आणि बुवांनी ज्येष्ठ आणि प्रमुख पुजाऱ्याला सांगितले, ''आज आम्ही आमची सेवा भगवान शंकरांच्या समोर सादर करणार आहोत.''

प्रमुख पुजारी प्रसन्न झाला. धर्मशाळेत बुवांना पखवाज वाजवताना त्याने ऐकले होते. तो त्यांचे कसब मानायलाही लागला होता; पण पूर्ण वेळ ऐकायचा योग काही आला नव्हता आणि कलाकारांच्या मर्जीने व कलाने घ्यायला हवे इतकी समज व अनुभव असल्यामुळे त्याने बुवांना त्याबाबत काही आग्रहही केला नव्हता.

रात्री देवळात गाभाऱ्यासमोर बुवांसाठी बिछायत मांडण्यात आली. दोन भव्य समयाही लावण्यात आल्या. बुवांचा पखवाज रामने बिछायतीवर आणून ठेवला. इतर शागीर्दांनी बाकीचे सामान आणले व ते तिथेच बसले. आज विशेष पर्वणी आहे, हे मात्र त्यांनी जाणले होते आणि गुरूच्या बोटांची व हातांची करामत पाहायला व ऐकायला ते कमालीचे उत्सुक झाले होते.

नऊच्या ठोक्याला बुवा देवळात आले. त्यांचा थाट काही और होता. डोक्याला मंदील बांधलेला, अंगात रेशमी कुर्ता व जरीकाठाचं रेशमी धोतर, गळ्यात रुद्राक्षांची माळ, कपाळाला गंध लागलेले. बुवांनी पशुपतिनाथाला नम्रपणे वंदन केले आणि बिछायतीवर बैठक मारली. एक चक्रदार परण वाजवून बुवा समेवर आले आणि देवळात असलेल्या साऱ्यांना माना डोलवल्या. त्यांच्या पखवाज वादनाने सारे देऊळ दुमदुमायला लागले. जेव्हा बोटातून मृदू स्वर निघायचे तेव्हा एखादा निर्झरच वाहतो आहे काय, असे वाटायचे. तीव्र आणि द्रुताच्या बोलांमध्ये मयूराचे नर्तन चालल्याचा भास व्हायचा आणि कडकडणारे बोल निघायचे तेव्हा शंकराच्या माथ्यावर स्वर्गातून कोसळणाऱ्या गंगौघाची आठवण व्हायला लागली.

''सुनो, मेरे बच्चो, अब यह गजराज बाज सुनो और भगवान शंभु को याद करो.''

बुवांनी प्रसन्नतेने आणि एका वेगळ्याच आत्मविश्वासाने आपल्या शागीर्दांना सांगितले. बाज कठीण आणि दुष्कर समजला जात होता. तो वाजवायला हात वज्रासारखे असावे लागायचे, तपश्चर्या करावी लागायची आणि हृदयात विलक्षण भावव्याकुळता असावी लागायची.

बुवांनी मोठ्या तयारीने गजराज बाज वाजवायला सुरुवात केली आणि त्या विलक्षण बोलांनी व तालाने आपण आपली जाणीव विसरतो आहे की काय, असे रामला वाटायला लागले. पाहता पाहता बुवा द्रुतात वाजवायला लागले, लय दुपटीत गेली, दुपटीतून चौपट, चौपटीतून आठपट.

आणि एकाएकी रस्त्यावर हलकल्लोळ झाला. काहीतरी भयंकर गडबड घडतेय, एवढे देवळातल्या साऱ्यांना वाटून गेले. साऱ्यांच्या नजरा रस्त्याकडे वळल्या. रामची इच्छा नसून व बुवांना आवडणार नाही, हे माहीत असूनही त्याने रस्त्यावर पाहिले... आणि... आणि डोळ्यांवर त्याचा विश्वास बसेना... त्याचे डोळे विस्फारले... आश्चर्यचकित होऊन तोंड उघडले गेले ते मिटेचना... रामची जी अवस्था झाली तीच अवस्था देवळाच्या सर्व पुजाऱ्यांची, प्रेक्षकांची आणि श्रोत्यांची झाली होती.

नेपाळच्या नरेशांचा प्रमुख हत्ती... ऐरावत... पायातले साखळदंड तोडून पशुपतिनाथाच्या मंदिरात शिरत होता...शिरला होता, त्याच्यामागे त्याचे माहूत, सैनिक, बघे यांचा जथ्थाच्या जथ्था धावत, ओरडत येत होता.

तो प्रचंड गजराज, ऐरावत देवळात शिरलासुद्धा.

पाहणाऱ्यांच्या काळजाचे ठोके चुकले, हृदये भीतीने कापून उठली... काहीतरी भयंकर घडणार... तो हत्ती आता बुवांना आणि त्यांच्या शागीर्दांना चिरडणार... रगडून टाकणार... असे वाटू लागले. सगळेच अवाक झाले होते... मौन झाले होते... त्यांच्या तोंडातून आवाजही निघत नव्हता...

बुवांना याची काही कल्पनाही नव्हती. ते आता वादनात पूर्ण रंगून तल्लीन होऊन गेले होते. होणाऱ्या गोंधळाकडे त्यांनी क्षणभर पाहिले, धावत येणाऱ्या ऐरावतालाही पाहिले आणि प्रसन्नपणे हसले.

राम तर विस्मित होऊन पाहत होता. शेवटी गजराज ऐरावत देवळात शिरला आणि शांत होऊन बुवांसमोर बसला. बुवांनी वादनात खंड न पाडता त्याला प्रणाम केला आणि सुंदर वळणदार परण वाजवून गजराज बाजाची सांगता केली.

त्या रात्री रामने आणि सर्वच शागीर्दांनी बुवांची अतिशय प्रेमाने पूज्य भावनेने आणि देव समजून चरणसेवा केली. संगीतातल्या सामर्थ्याचा प्रत्यय रामला आला होता. तपस्येचे, निःस्वार्थ तपस्येचे, अकिंचन तपस्येचे आणि अयाचित वृत्तीने केलेल्या तपस्येचे महत्त्व कळून चुकले होते. आपले पुढील जीवन कसे असावे, याचा याहून दुसरा कोणताही उत्तम आणि परमोत्कृष्ट आदर्श मिळणार नाही, हाही साक्षात्कार रामला तेव्हाच झाला. लयभास्कर पर्वतकरांकडे येण्याचे फलित पदरात पडले होते.

साभार


**पुस्तकाचे नाव: दिव्यस्पर्शी**


लेखकाचे नाव: धनंजय देशपांडे

प्रकाशक: मनोहर य. जोशी

प्रसाद प्रकाशन, १८९२, सदाशिव पेठ, पुणे-३०

पान : १४८ ते १५४


पर्वतीकर



स्व. खाप्रुमाम पर्वतकर
यांचे ज्येष्ठ चिरंजीव
स्व. रामकृष्ण पर्वतकर



स्व. खाप्रुमाम यांचे चंद्रेश्वर पर्वतावरील मूळ घर



खाप्रुमामांची तिसरी पिढी - स्व. सुर्यकांत लक्ष्मणराव पर्वतकर यांचे चिरंजीव
सर्वश्री विलास, सुहास, प्रदीप व किरण पर्वतकर



## ‘लयभास्कर’

**श्री. लक्ष्मणराव उर्फ खाप्रुजी पर्वतकर**

यांचा त्यांच्या वयाला एकाहत्तर वर्ष लागल्याबद्दल
पुण्यात २४ व २५ तारखेला सत्कार करण्यात आला.
या समारंभाला
डॉ. जयकर, पं. ओंकारनाथ ठाकूर, मोगूबाई अझमत हुसैन
यांचे संदेश आले होते. त्याप्रसंगीचे छायाचित्र

**साभार**
दै. लोकशक्ती



स्व. खाप्रुमाम यांचा पुतळा




स्व. खाप्रुमाम यांच्या वाद्यांची औजारे






स्व. खाप्रुमाम पर्वतकरांची चंद्रेश्वर पर्वतावरील समाधि

# युग भास्कर






KALA ACADEMY GOA

Campal, Panaji - Goa 403 001. **Tel.:**(0832) 2420451/52/53/54 **Fax:** (0832) 2420457
**Email:** Kalaacademygoa@yahoo.co.in